# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, दुसरा मजला, (द.क.)बेलापूर,नवी मुंबई -४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७ १६७३, २७५७ ०१६६, २७५७ १६७७.
फॅक्स : २७५७ ०९६९, २७५७ १६६६.

१०७/C

**क्र.मजीप्रा/२०१६/सभा-१३७/(२६)/आ.४** **दिनांक : ३० .९.२०१६**

**प्रति,**
मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
संचालक (तां.) तथा प्राधिकरणाचे सदस्य, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१.

**विषय :** दि.२३ ऑगस्ट, २०१६ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३७व्या बैठकीचे इतिवृत्त.

**महोदय,**

दिनांक २३ ऑगस्ट, २०१६ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३७व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

**आपला विश्वासू,**

३०/९/१६

**(उदय जाधव)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी**

**प्रत :** खाजगी सचिव (मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, मजीप्रा यांचे कार्यालय), मंत्रालय, मुंबई.
सोबतचे इतिवृत्त मा.मंत्री, पा.पु. व स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे ही विनंती.

**माहितीसाठी व त्वरित कार्यवाहीसाठी.**

संचालक (वित्त) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

मुख्य अभियंता, म.जी.प्रा., प्रादेशिक विभाग, ठाणे / पुणे / नाशिक / औरंगाबाद/ अमरावती / नागपूर.

उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

अधीक्षक अभियंता, (मुख्यालय), मजीप्रा, मुंबई.

उप मुख्य लेखाधिकारी (१ / २) म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.

आस्थापना अधिकारी (दक्षता), म.जी.प्रा., एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.

कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.

प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी, म.जी.प्रा., एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.

सर्व कक्ष अधिकारी / कार्यासन अधिकारी (आस्थापना - ) म.जी.प्रा., मुंबई / सिडको भवन, नवी मुंबई.

सोबत इतिवृत्तातील आपल्या कार्यालयाशी संबंधित कार्यक्रम बाबीवर त्वरित योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा कार्यपुर्ती अहवाल १० दिवसांत मध्यवर्ती कार्यालयात सादर करावा.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३७ व्या सभेचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १३७ वी सभा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.ना.श्री.बबनराव लोणीकर यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक २३ ऑगस्ट, २०१६ रोजी सकाळी ११.०० वा. मा.मंत्री, पा.पु. व स्व. यांचे दालनात, मंत्रालय, मुंबई ४०००३२, येथे संपन्न झाली. या सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा.ना.श्री.बबनराव लोणीकर, मंत्री, पा.पु.व स्व.तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२) मा.श्री.राजेश कुमार, प्रधान सचिव, पा.पु.व स्व.विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
३) मा.हेमंत लांडगे, संचालक (तां.) तथा प्राधिकरणाचे सदस्य.
४) श्री.संतोष कुमार, सदस्य सचिव, म.जी.प्रा. मुंबई.
५) मा.श्री.शि. फ. घाडगे, कक्ष अधिकारी (प्रतिनिधी) सचिव, ग्राम विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनिधी.

या व्यतिरिक्त सदर सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री.सुधाकर डांगे, संचालक (वित्त), म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.
२) श्री.एस.बी.भुजबळ, अधीक्षक अभियंता, (मुख्यालय) म.जी.प्रा., मुंबई.
३) श्री.उदय जाधव, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा., मुंबई.

सर्व प्रथम मा. सदस्य सचिव यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पा.पु.व स्व.तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात करण्यांत आली. सभेमध्ये खालील बाबींवर चर्चा करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.१ :** म.जी.प्राच्या १३६ व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

म.जी.प्राच्या संचालक मंडळाची १३६ वी सभा दि. २८ मार्च, २०१६ रोजी संपन्न झाली होती. सदर सभेच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी मा. संचालक मंडळास केली.

इतिवृत्तावर चर्चा होऊन, १३६ व्या सभेच्या इतिवृत्तास मा. संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली.

**कार्यक्रम बाब क्र.२ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३६ व्या सभेपुढील बाबींवर करण्यात आलेली कृतीच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि. २८ मार्च, २०१६ रोजी संपन्न झालेल्या १३६ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले त्या निर्णयाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार १३६व्या सभेपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कृतीस मान्यता देण्यात आली.

मा.मंत्री,
पा.पु. व स्व तथा

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.३ :** मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत जालना जिल्ह्यातील १७६ गावांसाठी ग्रीड पध्दतीची पाणी पुरवठा योजना, ता. परतूर, मंठा व जालना, जि. जालना. **योजनेची देखभाल व दुरुस्ती मजीप्रामार्फत करणेबाबत.**

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत जालना जिल्ह्यातील १७६ गावांसाठीच्या ग्रीड पध्दतीची पाणी पुरवठा योजना प्रस्तावित आहे. या योजनेमधुन जालना, परतूर व मंठा तालुक्यातील बहूतांशी टंचाईग्रस्त असलेल्या गावांचा समावेश आहे. योजनेचा मोठा आवाका लक्षात घेता सदर योजनेचे नियोजन, अंमलबजावणी व देखभाल दुरुस्ती मजीप्रा मार्फत करण्याची बाब संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी कार्यक्रम बाब सादर करण्यात आली.

योजना मजीप्रा मार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन तांत्रिक मंजूरी नंतर शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यांत आली आहे. योजनेची अंमलबजावणी मजीप्रा मार्फत करण्यात येणार असून देखभाल दुरुस्ती सुध्दा शासनाच्या वतीने मजीप्रा मार्फत करण्याचे प्रस्तावित आहे. सदर योजना चालविण्या करिता येणारा अपेक्षीत खर्च व संभाव्य उत्पन्न याचा तपशिल खालील प्रमाणे.

| सन | पंपिंग तास | देखभाल-दुरुस्ती खर्च | पाणीपट्टी वसूली |
|---|---|---|---|
| २०१९ | १३.५० | रु.३३१.०६ लक्ष | रु.३४९.६१ लक्ष |
| २०२९ | १६.०० | रु.७४२.०५ लक्ष | रु.७४२.७७ लक्ष |
| २०३९ | १९.०० | रु.१५२६.७० लक्ष | रु.१५४५.५७ लक्ष |

शासकीय धोरणानुसार योजना तयार झाल्यानंतर संबंधीत ग्रामपंचायत / जिल्हा परिषद यांचेकडे हस्तांतरीत करणे अपेक्षीत असते. या योजनेच्या बाबतीत देखभाल व दुरुस्ती मजीप्रा मार्फत करण्याचे प्रस्तावित असल्याने सदर बाब संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आली होती. या बाबीवर सविस्तर चर्चा होवून खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यांत येतो की, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत जालना जिल्ह्यातील १७६ गावांसाठीच्या ग्रीड पध्दतीच्या पाणी पुरवठा योजनेची महाराष्ट्र शासनाच्या वतीने देखभाल व दुरुस्ती करणे, योजनेतील समाविष्ट गावांना व इतर ग्राहकांना ठोक पाणी पुरवठा करणे व पाणीपट्टीची वसूली मजीप्रामार्फत करण्यास, ही तसेच मजीप्रामार्फत चालविण्यात येणा-या इतर ग्रामीण पाणी पुरवठा योजना चालविताना आर्थिक तूट उद्भवल्यास शासनामार्फत त्याची प्रतिपूर्ती करण्यात येईल, या अटीवर १७६ गावांसाठीच्या योजनेची देखभाल व दुरुस्ती करण्यास मा.संचालक मंडळ मान्यता देत आहे.

या योजनेच्या बाबतीत नियमित पाणीपट्टी भरणे/ वसूली करणे विषयी आवश्यक तो करारनामा मजीप्रा व जिल्हा परिषद/ ग्रामपंचायत यामध्ये करुन घ्यावा. त्याचप्रमाणे योजना मजीप्रामार्फत चालविताना, योजना चालविण्याचा खर्च व पाणीपट्टी वसूली यांचा विचार करुन, आर्थिक तूट उद्भवल्यास तूटीची रक्कम शासनामार्फत उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने, मजीप्रा मार्फत चालविण्यांत येणाऱ्या इतर पाणी पुरवठा योजनांच्या धर्तीवर, आवश्यक प्रस्ताव शासनास सादर करावा. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.४ :** मजीप्रामार्फत अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या विविध कामांच्या निविदा सूचना वर्तमान पत्रांमध्ये प्रसिध्द करण्यासाठी जाहिरातदार संस्थेची निवड करणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबींबाबत सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले. तसेच अधीक्षक अभियंता (मु.) यांनी प्रस्तावित सुधारणाबाबत सादरीकरण केले.

मजीप्रामार्फत अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या विविध प्रकारच्या कामांकरिता मुख्यत्वे संबंधित कार्यकारी अभियंता, मजीप्रा यांचेमार्फत निविदा सूचना प्रसिध्दीसाठी पाठविण्यात येतात. सद्य:स्थितीत या करिता माहिती व जनसंपर्क संचालनालय यांचेकडे जाहिरातींचे मसुदे पाठविण्यात येतात व कामांच्या किंमतीनुसार राष्ट्रीय, राज्य आाणि जिल्हा स्तरावरील सर्वाधिक खपाच्या तीन वर्तमान पत्रांपैकी एकामध्ये आळीपाळीने जाहिराती प्रसिध्द करण्याची विनंती करण्यात येते. तथापि, अनेक वेळी असे निदर्शनास येते की, मजीप्राच्या विनंतीनुसार सर्वाधिक खपांच्या वर्तमान पत्रांमध्ये जाहिराती प्रसिध्द न करता, इतर वर्तमान पत्रांमध्ये प्रसिध्दीसाठी पाठविल्या जातात. त्यामुळे एखाद्या कामासाठी आवश्यक असलेली पुरेशी प्रसिध्दी दिली जात नाही.

मजीप्राच्या कामांकरिता वर्तमान पत्रांमध्ये द्यावयाच्या प्रसिध्दीबाबतचे धोरणास मा.संचालक मंडळाच्या दि.६.१०.२०१५ रोजी झालेल्या १३४व्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने सदस्य सचिव या कार्यालयाचे परिपत्रक क्र.१६६, दि.२.९.२०१५ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, सद्य:स्थितीत शासनाच्या धोरणानुसार आळीपाळीने विविध वर्तमान पत्रांमध्ये जाहिराती प्रसिध्द होतात, त्यामध्ये सर्वाधिक खपाच्या दैनिकांचा समावेश असेलच असे सांगता येत नाही. परिणामी, अलिकडील काळात मजीप्राच्या जाहिरातींना पुरेसा प्रतिसाद मिळत नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे या बाबतीत मजीप्राचे स्वत:चे धोरण ठरविणे गरजेचे झाले आहे, जेणकरून मजीप्राला हव्याअसलेल्या वर्तमान पत्रांमध्ये जाहिराती प्रसिध्द करतायेतील.

वरील बाबी लक्षात घेता, मजीप्रामार्फत वर्तमानपत्रांमध्ये जाहिराती प्रसिध्द करणेकरिता खाजगी जाहिरातदार संस्थेची निवड करण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. या संबंधी चर्चा होवून खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

मजीप्रामार्फत अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या विविध प्रकारच्या कामांना सर्वात जास्त खपाच्या वर्तमानपत्रामध्ये पुरेशी प्रसिध्दी मिळण्याच्या दृष्टीने मजीप्राच्या जाहिराती खाजगी जाहिरातदार संस्थेच्या माध्यमातून प्रसिध्दीस देण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. याबाबत पुढील कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.५ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पुनर्गठनासंदर्भात अहवाल सादर करण्यासाठी नेमण्यात आलेल्या मे. प्राईस वॉटर हाऊस कूपर्स, हरियाणा या सल्लागाराचे काम आहे त्या स्थितीत अंतिम करण्याबाबत.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

- प्रथमत:मजीप्राच्या संस्थात्मक सुधारणेबाबत शासनामार्फत फिडबॅक वेंचर या सल्लागार संस्थेची सन २००२ मध्ये नियुक्ती करण्यात आली होती. या संस्थेने त्यांच्या अहवालात मजीप्राच्या पालकत्वाखाली देखभाल दुरस्ती कंपनी व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार कंपनी अशा दोन कंपन्यांची निर्मिती करणे आवश्यक असल्याचे आपल्या अहवालात नमूद केले होते.
- त्यास अनुसरुन शासनाने मजीप्राच्या पुनर्गठनाची अंमलबजावणी करणेबाबत सल्ला देण्यासाठी सन २००८ मध्ये क्रिसिल या संस्थेची नियुक्ती केली होती. क्रिसिल संस्थेने आपल्या अहवालात मजीप्राच्या पालकत्वाखाली देखभाल दुरस्ती कंपनी व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार कंपनी अशा दोन कंपन्यांची निर्मिती करण्याची शिफारस केली होती.
- सल्लागारांनी प्रस्तावित केलेल्या संरचनेच्या धर्तीवर मजीप्राचे कामकाज सुरु होण्याच्या दृष्टीने दि.२६.८.२००८ रोजीच्या मजीप्रा संचालक मंडळाच्या १११ व्या बैठकीत कार्यक्रम बाब क्र.५ नुसार, मजीप्राच्या संरचनेमध्ये बदल करुन प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, जलव्यवस्थापन, नागरी व ग्रामीण योजनांची अंमलबजावणी, अद्ययावत तंत्रज्ञान सहाय्य अशी संरचना प्रस्तावित करण्यात आली होती. या ठरावाची अंमलबजावणी सन २०११ मध्ये करण्यात आली.
- दरम्यानच्या काळात मजीप्राच्या पालकत्वाखाली देखभाल दुरस्ती कंपनी व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार कंपनी अशा दोन कंपन्यांची निर्मिती करण्याचा प्रस्ताव मजीप्राच्या संचालक मंडळाच्या दि.१३.५.२०१० रोजी झालेल्या ११७ व्या बैठकीत सादर करण्यात आला होता. बैठकीमधील कार्यक्रम बाब क्र.५ अन्वये पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला होता.
  "मजीप्राच्या पालकत्वाखाली व शासनाच्या अधिपत्याखाली प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवेसाठी तसेच पाणी पुरवठा, मलनि:सारण योजनांच्या देखभाल व दुरुस्ती संबंधित कामासाठी मजीप्रा अंतर्गत दोन स्वतंत्र कंपन्या स्थापन करण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली असून, पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव शासनाला सादर करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."
- प्रस्तावित कंपन्या स्थापन करण्याच्या दृष्टीने कन्सेप्ट प्लॅन, बिझिनेस प्लॅन, मजीप्रा आणि कंपन्यांमधील परस्पर संबंध कसे असावेत, हे ठरविणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे कंपन्या प्रत्यक्षात अस्तित्वात येण्यापूर्वी अशा पुनर्रचने संदर्भातील प्रशासकीय, वित्तीय व कायदेशीर बाबी, विशेषत: निवृत्ती वेतनाचे दायित्व इ. बाबी विचारात घेऊन प्रस्तावाची अंमलबजावणी कशी करावी या संबंधी शासनास अहवाल सादर करणे आवश्यक होते. तसेच संभाव्य संरचनेची व्यवहार्यता तपासण्याच्या दृष्टीने नव्या सल्लागाराची नेमणूक करणे आवश्यक होते. पुनर्रचनेचा तपशील, कार्यभार ठरविणे इ. रुपरेषा ठरविण्याच्या दृष्टीने सल्लागार नेमण्यास तत्कालिन सदस्य सचिव यांनी दि.२३.१.२०१३ च्या टिप्पणीव्दारे मान्यता दिली.
- तद्नंतर, या कामी खाजगी सल्लागारांची नेमणूक करण्याचा प्रस्ताव सन २०१३ मध्ये तयार करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. तथापि, एकच निविदा प्राप्त झाल्याने, निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली. सन २०१४ साली या कामासाठी पुन:श्च निविदा मागवून विहित निविदा प्रक्रियेअंती मे.प्राईस वॉटर हाऊस कूपर्स, हरियाना या सल्लागाराची दि.४.१.२०१५ रोजी नियुक्ती करण्यात आली.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**सल्लागाराची कार्यकक्षा, पूर्ण झालेले काम इत्यादी तपशील पुढीलप्रमाणे आहे :**

- संभाव्य संरचनेची व्यवहार्यता तपासण्याच्या प्रकरणी सल्लागारानी स्वीकृत निविदेनुसार पुढील टप्प्यानुसार अहवाल सादर करणे अपेक्षित होते.

| | |
|---|---|
| १. | **Inception Report** : प्रस्तावित कामाच्या अंमलबजावणीची ढोबळ रुपरेषा. |
| २. | **Draft Concept Plan** : प्रस्तावित कामाच्या अंमलबजावणीची सविस्तर रुपरेषा |
| ३. | **Final Concept Plan** : मजीप्राच्या अभिप्रायानंतर अंतिम करण्यात आलेली सविस्तर रुपरेषा |
| ४. | **Draft Business Plan** : मजीप्राचा कमी झालेला कार्यभार व त्या अनुषंगाने कमी झालेले उत्पन्न विचारात घेऊन प्रस्तावित प्रारुप उपाययोजना. |
| ५. | **Final Business Plan** : मजीप्राच्या अभिप्रायानंतर अंतिम अहवाल करण्यात आलेल्या अंतिम उपाय योजनाबाबत अहवाल. |

- या कामाच्या स्वीकृत देकाराची किंमत रु.४६,८९,०००/- इतकी आहे. सल्लागारास दि.४.१२.२०१४ रोजी कार्यादेश देण्यात आले.
- सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी कार्यादेशाच्या दिनांकापासून १८२ दिवस म्हणजेच, दि.३.६.२०१५ पर्यंत होता.
- प्रस्तावित कामांपैकी पहिले २ टप्पे पूर्ण झाले आहेत. सल्लागारास त्यांनी केलेल्या कामापोटी निविदेतील अटीनुसार, एकूण कामाच्या किंमतीच्या ३०% इतकी रक्कम रु.१४.०७ लक्ष अदा करण्यात आली आहे.
- सल्लागारांना देण्यात आलेल्या कामाचा कालावधी वाढविण्याचे आदेश देण्यात आलेले नाहीत.

उपरोक्त बाबी लक्षात घेता खालीलप्रमाणे प्रस्ताव मंजूर करण्याची विनंती मा.संचालक मंडहास करण्यात आली होती.

- सन २०११ साली अस्तित्वात आलेल्या संरचनेनुसार प्रत्यक्ष कामकाज करताना काही अडचणी येत असल्याचे लक्षात आल्याने व लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार, दि.१२.८.२०१४ रोजीच्या मजीप्रा संचालक मंडळाच्या १३१ व्या बैठकीत सादर करण्यात आलेल्या आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.१ नुसार पारीत केलेल्या ठरावाप्रमाणे मजीप्राच्या संरचनेमध्ये पुन्हा बदल करुन सन २०११ पूर्वी अस्तित्वात असलेल्या प्रणालीनुसार महसूल विभागनिहाय मुख्य अभियंता कार्यालये पुनर्स्थापित करण्यास आली आहेत.
- विविध पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमांतर्गत मजीप्राकडे सोपविण्यात येणारा कार्यभार राज्य शासनाच्या धोरणावर अवलंबून आहे. त्याचप्रमाणे सद्य:स्थितीत मजीप्राचे अधिकारी/ कर्मचारी/सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या वेतन व भत्त्याचे दायित्व शासनाने स्वीकारण्याविषयीचा प्रस्ताव, शासनाकडे सादर करण्यात आलेला असून तो मान्यतेच्या अंतिम टप्प्यात आहे.
- वरील सर्व बाबींचा विचार करता, सद्य:स्थितीत निविदा क्र.बी-१/२० सन २०१४-१५ नुसार नेमण्यात आलेल्या मे.प्राईस वॉटर हाऊस कूपर्स, हरियाणा या सल्लागाराची पुढील टप्प्यातील कामांची आवश्यकता वाटत नाही. त्यामुळे सद्य:स्थितीत मजीप्राच्या पुनर्रचनेसंदर्भात आवश्यक उपाययोजना सुचविण्यासाठी नेमण्यात आलेल्या मे. प्राईस वॉटर हाऊस कूपर्स, हरियाना यांची निविदा आहे त्या स्थितीत बंद करुन सल्लागाराने निविदेपोटी भरलेली सुरक्षा अनामत रक्कम सल्लागारास परत करुन लेखेजोखे अंतिम करण्यास मान्यता देण्याची विनंती मा.संचालक मंडळास करण्यात आली.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

सदर प्रस्तावावर चर्चा करण्यात येऊन प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली व खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यांत येतो की, म.जी.प्रा. पुनर्रचनेसंदर्भात आवश्यक उपाययोजना सुचविण्यासाठी मे.प्राईस वॉटर हाऊस कूपर्स, हरियाना या सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली होती. सद्य:स्थितीत या सल्लागाराची आवश्यकता नसल्याने या निविदेंतर्गत काम आहे त्या स्थितीत बंद करावे. तसेच सल्लागाराने निविदेपोटी भरलेली सुरक्षा अनामत रक्कम परत करुन या निविदेचे लेखेजोखे बंद करणेत यावेत.

याबाबत पुढील कार्यवकाही करण्यासाठी सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.६.** म.जी.प्रा. च्या पाणी पुरवठा केंद्रावरील ग्राहकांसाठी पाणी देयके तयार करणे व त्या अनुषंगाने एकत्रित माहिती तयार करणेसाठी संगणकीय प्रणाली विकसीत करणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सध्या २४ शहरी पाणी पुरवठा केंद्रे व ३२ ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची दैनंदिन देखभाल दुरुस्ती करण्यात येत आहे. या २४ नागरी पाणी पुरवठा केंद्राधारित एकूण २४९४७४ ग्राहक असून ३२ ग्रामीण पाणी पुरवठा योजनाआधारित ६८,१८८ ग्राहक आहेत. अशा प्रकारे एकूण ५६ पाणी पुरवठा योजनांधारित सर्वसाधारणपणे ३,१७,६६२ ग्राहक आहेत. २४ नागरी पाणी पुरवठा योजनांद्वारे दरमहा सुमारे १२१५२० तर ३२ ग्रामीण पाणी पुरवठा योजनांद्वारे दरमहा सुमारे ३७७१९ ग्राहकांना म्हणजेच एकत्रित १,५९,२३९ (समजा १,६०,०००) पाण्याची देयके वितरीत केली जातात. म.जी.प्रा. च्या सकल उत्पन्नातील पाणी पुरवठा केंद्राद्वारे प्राप्त होणाऱ्या महसूलाचा वाटा लक्षणीय आहे.

सध्या विविध पाणी पुरवठा केंद्रे व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांवर तयार करुन वितरीत करण्यात येत असलेली देयके ही विविध ठिकाणी वेगवेगळया पध्दतीने तयार केली जातात. काही ठिकाणी म.जी.प्रा. अंतर्गतच उपलब्ध साधनसामुग्री वापरुन, काही ठिकाणी बाहय सहाय्याद्वारे तर काही ठिकाणी संगणक प्रणाली खेरीज तयार केली जातात. जलमापक वाचकांनी नोंदी आणल्यानंतर देयके तयार करणे, त्याची माहिती तयार करणे, देयकांची छपाई करणे, ग्राहकांना वितरीत करणे, ग्राहकांकडून देयकांप्रमाणे रक्कम गोळा करणे, त्यांचा हिशोब ठेवणे, ग्राहकांबाबतची माहिती तयार करणे, नवीन नळ जोडण्या, एकूण नळ जोडण्या, ग्राहकांचा पाणी वापर प्रकार, ग्राहकांच्या तक्रारी, याबाबत एकत्रित व एकाच स्वरुपाची प्रणाली सध्या म.जी.प्रा. कडे उपलब्ध नाही. त्यामुळे सध्याच्या पध्दतीमध्ये काही मर्यादा आहेत.

या मर्यादांवर मात करण्यासाठी मजीप्रामधील सध्याच्या पध्दतीत सुधारणा करुन एकत्रित मध्यवर्तीय संगणकीय प्रणाली तयार करणे, मजीप्राकडून उपलब्ध जलमापकाच्या नोंदीनुसार नोंदी घेणे, देयके तयार करुन बारकोडसहित छपाई करणे, संबंधीत विभागाकडे वितरणासाठी हस्तांतरित करणे, ग्राहकांना बारकोडसहित पावती देणे, आवश्यक ती हार्डवेअर देणे व त्यांची ५ वर्षे देखभाल करणे तसेच हे सर्व काम ५ वर्षासाठी करुन पुढील १ वर्ष तांत्रिक सहाय्य करण्याची व्याप्ती असलेली बाब प्रस्तावित करण्यात आली आहे. या प्रस्तावाची एकंदरीत

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

अंदाजित किंमत सुमारे रु. 6.86 कोटी आहे. तथापि, या कार्यक्रम बाबीस मान्यता दिल्यास, तेवढया रक्कमेची बचत होणार असल्याचे मा.संचालक मंडळाच्या निदर्शनास आणण्यात आले.

हे काम मजीप्राच्या विनिर्देष्ठतेनुसार करुन देण्याबाबतचा एक प्रस्ताव "येस बँक लिमिटेड" (SBL) यांचेकडून प्राप्त झाला आहे. या प्रस्तावानुसार "येस बँक मजीप्राला अभिप्रेत असलेल्या वरील सर्व बाबी (सॉफ्टवेअर हार्डवेअर, देयके तयार करणे व छपाई करणे, मजीप्रा आवश्यक सर्व अहवाल तयार करुन देणे इत्यादी) विनामूल्य करुन देण्यास तयार असून, पाणी पुरठा देयकान्वये ग्राहकांकडून वसूल करावयाची रक्कम, त्याबाबतचे व्यवहार तसेच रक्कमेचे संकलन (Collection) व भुगतान (Payment) याबाबत विशिष्ट पध्दत त्यांनी विनिर्दिष्टीत केली आहे. त्याचबरोबर इंटरनेट पेमेंट गेटवे, कॅश व चेकद्वारे संकलन इत्यादीबाबतही पध्दत विनिर्दिष्ठीत केली आहे. रोखीने संकलित होणारी रक्कम, चेकद्वारे जमा होणारी रक्कम ई-पेमेंटद्वारे जमा होणारी रक्कम, ऑनलाईन पध्दतीने जमा होणारी रक्कम व इतर पध्दतीने जमा होणारी रक्कम इत्यादीबाबत आकारावयाची पध्दत सुध्दा विनिर्दिष्ठीत केली आहे. येस बँकेने प्रस्तावाबाबत नमुद केल्यानुसार मजीप्राने येस बँकेकडे कलेक्शन अकाऊंट, ऑपरेशन अकाऊंट व पेमेंट अकाऊंट व सेव्हिंग अकाऊंट उघडणे आवश्यक आहे. सध्या हे अकाऊंट स्टेट बँक ऑफ इंडियाकडे आहे. ज्या दराने स्टेट बँक ऑफ इंडिया व्याज देत आहे, त्याच दराने येस बँक सुध्दा देणार आहे.

वरील प्रस्तावाबाबत मा.सदस्य सचित यांनी मा.संचालक मंडळास सविस्तररित्या अवगत करुन ही प्रस्तावित प्रणाली मजीप्राच्या देयक पध्दतीसाठी वापरल्यामुळे मजीप्राच्या पाणी पुरवठा केंद्रावरील वितरित होणारी देयक पध्दत व त्यामुळे मिळणारा महसूल, त्याबाबतची लेखा पध्दती, हिशोबबाहय पाण्याचे प्रमाणे, ग्राहक तक्रार निवारण, मजीप्राला आवश्यक असणारे विविध अहवाल, लेखाविषयक बाबी इ. गोष्ठी सुनियोजितरित्या व अमूलाग्र बदलासहित पार पडतील, असे विदित केले.

प्रस्तावित कामे करण्यासाठी मजीप्राला थेट भांडवली खर्च करावा लागणार नसून येस बँकेकडे मजीप्राची सेव्हींग खाती उघडण्याच्या कामापोटी येस बँक 5 वर्षासाठीचे काम करणार आहे. शिवाय सध्याही मजीप्राचा या देयक वितरण शीर्षावर होणारा खर्च मजीप्राला करावा लागणार नाही. यास्तव, वर नमुद केल्याप्रमाणे मजीप्राला आवश्यक असणारी मध्यवर्ती संगणकीय प्रणाली येस बँक लिमिटेड यांचेकडून राबविणे व मजीप्राची सेव्हींग खाती येस बँकेकडे सुरु करण्याच्या या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत मा.संचालक मंडहास विनंती करण्यात आली. या प्रस्तावावर चर्चा होऊन मा.संचालक मंडळाने मान्यता देऊन पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, कार्यक्रम बाबीमध्ये नमूद केल्याप्रमाणे येस बँक लिमिटेड यांचेकडून मजीप्राच्या पाणी पुरवठा केंद्रावरील देयक प्रणाली सुधारण्यासाठी आवश्यक असणारी मध्यवर्ती संगणकीय प्रणाली राबविण्यासाठी पुढील शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

1. येस बँक लिमिटेडबरोबर आवश्यक त्या अटी व शर्तीनुसार करार करण्यात यावा.
2. येस बँक लिमिटेडने मजीप्राला आवश्यक असणा-या सर्व बाबींचा व सर्व मोडयूल नुसार आवश्यक बाबींचा अंतर्भाव त्यांच्या प्रणालीत करण्यात यावा.

| | |
|---|---|
| मा. मंत्री, | सदस्य सचिव |
| पा.पु. व स्व. तथा | म.जी.प्रा. |
| अध्यक्ष, म.जी.प्रा. | |

3. येस बँकेने कामाच्या व्याप्तीमध्ये नमुद केल्यानुसार हार्डवेअर, सॉफ्टवेअर पुरवठा करुन देयक प्रणाली विकसित करुन देयके मजीप्राला देणे इत्यादी नमुद सर्व कामांचा त्यात अंतर्भात असावा.
4. येस बँकेकडे मजीप्राची सेव्हींग खाती उघडण्यापूर्वी सर्व दस्तऐवजांची कायदेशीर पूर्तता मजीप्राच्या वित्त शाखेने तपासून पूर्तता करावी.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास मा.सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.७:** महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाप्रमाणे सहकारी गृहनिर्माण प्रकल्प व खाजगी क्षेत्रातील बिल्डर्समार्फत उभारण्यात येणाऱ्या निवासी वसाहतींना पाणी पुरवठा करण्याबाबत भांडवली अंशदानाचा दर लागू करण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास खालील प्रमाणे अवगत केले. मजीप्रा च्या अधिनियम १९७६ च्या कलम - २७ मधील तरतुदीनुसार प्राधिकरणाने आपला कारभार शक्यतो विना तोटा चालवावयाचा आहे. तसेच या तरतुदीच्या पुर्ततेसाठी अधिनियमातील कलम - ३५(१) नुसार पाणी दराबाबत वेळोवेळी आढावा घेवून दर सुधारित कराण्याचे अधिकार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला आहेत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अखत्यारीतील पाणी पुरवठा केंद्र व इतर पाणी पुरवठा केंद्रातून सहकारी गृह निर्माण प्रकल्प, खाजगी क्षेत्रातील बिल्डर्स व इतर व्यावसायिक /औद्योगिक कामासाठी पाणी पुरवठाच्या जोडणी दिल्या जातात. तथापि, त्यांच्याकडून भांडवली खर्च वसूल केला जात नाही. त्यामुळे संबंधीत पा.पु. केंद्रातून पाणी पुरवठा करण्यात येणा-या सहकारी गृहनिर्माण प्रकल्प व खाजगी क्षेत्रातील बिल्डर्समार्फत उभारण्यात येणा-या निवासी वसाहतींना तसेच व्यावसायिक /औद्योगिक पाणी पुरवठा करण्याबाबत भांडवली अंशदानाचे दर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दि.८.८.२००० रोजी झालेल्या २६८ व्या सभेत ठराव क्र.३७६० अन्वये सन २०००-२००१ च्या भांडवली अंशदानाच्या रु.२५०० प्र.घ.मी. भांडवली अंशदानाच्या दरात दरवर्षी ७% प्रमाणे वाढ करण्याबाबत धोरणात्मक निर्णय झाला. त्याअनुषंगाने प्रत्येक वर्षी भांडवली अंशदानाच्या दरात ७% प्रमाणे वाढ करुन सुधारित दर लागू करण्यात येत आहे.

सहकारी गृहनिर्माण प्रकल्प व खाजगी क्षेत्रातील बिल्डर्स मार्फत उभारण्यांत येणाऱ्या निवासी वसाहतींना पाणी पुरवठा करण्याच्या आकाराबाबत भांडवली अंशदानाचे दर दि.१.१.२०१६ पासून ते दि.१.१.२०१८ पर्यत आकारण्याबाबत प्रस्ताव असल्याचे मा.संचालक मंडळास अवगत केले. याबाबत सर्वंकष चर्चा झाल्यानंतर खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :** असा ठराव सकरण्यांत येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सहकारी गृहनिर्माण प्रकल्प व खाजगी क्षेत्रातील बिल्डर्समार्फत उभारण्यात येणाऱ्या निवासी वसाहतींना, तसेच उद्योगांना पाणी पुरवठा करण्याच्या आकाराबाबत भांडवली अंशदानाचे दर दि.१.१.२०१६ पासून ते दि.१.१.२०१८ पर्यत खालील प्रमाणे आकारण्यात यावेत.

| अ.क्र. | सुधारित दर लागू करण्याचा दिनांक | भांडवली अंशदानाचा दर प्र.घ.मी. |
|---|---|---|
| १. | १.१.२०१६ | रु.३७,५२५.०० |
| २. | १.१.२०१७ | रु.४०,१५०.०० |
| ३. | १.१.२०१८ | रु.४२,९६०.०० |

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

याबाबत कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.८ :** राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणुकीस मान्यता मिळण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबी बाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरती शिल्लक रक्कम योग्य रित्या गुतवावी याबाबत शासनाने दि.२७.१०.२०१५ अंतर्गत सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकूनही अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणुका केल्या जातात, असे संचालक मंडळास अवगत करण्यात आले.

प्राधिकरणाच्या १३६व्या बैठकीत दि.३०.१.२०१६ ते दि.१६.३.२०१६ या कालावधीचे अल्प / दीर्घ मुदतीच्या गुंतवणुकीचे प्रस्ताव सादर करण्यात आले होते. त्यास मान्यता प्राप्त झाली आहे. आता दि. १७.३.२०१६ ते दि. १९.७.२०१६ या कालावधीत केलेल्या अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणुकीस मा. संचालक मंडळाची मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावावर चर्चा करण्यात येऊन प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली व खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, दि. १७.३.२०१६ ते दि. १९.७.२०१६ या कालावधीत प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे करण्यात आलेल्या अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणुकीस मान्यता देण्यांत येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.९:** पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनेंतर्गत विविध पाईपलाईनच्या हायड्रॉलिक संकल्पनांच्या कामांसाठी संबंधित अभियंत्यांना प्रोत्साहन भत्ता देणे बाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

सद्य:स्थितीत पाणी पुरवठा व जलनि:सारण योजनेतंर्गत उर्ध्ववाहिनी, गुरुत्ववाहिनी, वितरण व्यवस्था इ. विविध पाईपलाइनची हायड्रॉलिकची संकल्पने EPANET, Branch, Loop अशा पब्लिक डोमेन सॉफ्टवेअरचा वापर करुन करण्यात येतात. सदर सॉफ्टवेअर ही DOS वर आधरित आहेत व त्यांची क्षमताही मर्यादीत आहे. सद्य:स्थितीत सुधारित तंत्रज्ञानावर आधारित अद्यावत व वेगवेगळे फिचर्स असलेली सॉफ्टवेअर्स बाजारामध्ये उपलब्ध आहेत. उदा. ॲक्वीस, वॉटर जेम्स, सिवर जेम्स इत्यादी. सद्यस्थितीमध्ये पाणी पुरवठा व भूमीगत गटार योजनांसाठी सदर अद्यावत सॉफ्टवेअर वापरुन हायड्रॉलिक मॉडेलिंग करण्यात येते. अशा प्रकारे हायड्रॉलिक मॉडेलिंग करणे हे अधिक कौशल्याचे काम असल्यामुळे, सदर काम सर्वसाधारणपणे बाहेरील व्यावसायिक संस्था/ सल्लागार यांचेकडून करुन घेण्याचा कल आढळून येतो, ज्यासाठी प्रती नोड रु. ६००/- खर्च करावा लागतो.

| | |
|---|---|
| मा. मंत्री,<br>पा.पु. व स्व. तथा<br>अध्यक्ष, म.जी.प्रा. | सदस्य सचिव<br>म.जी.प्रा. |

मजीप्रामध्ये मुख्य अभियंता यांच्या अखत्यारातील विविध कार्यालयांमध्ये कार्यरत काही अभियंत्यांना वर उल्लेखित हायड्रॉलिक डिझाईन सॉफ्टवेअर वापरुन संकल्पन करण्याचा अनुभव आहे. मजीप्राच्या अभियंत्यांकडून हायड्रॉलिक संकल्पने In house करुन घेणे विचाराधीन आहे. त्यामुळे मजीप्रातील अभियंते अतिरिक्त कौशल्य प्राप्त करणे, त्याचा वापर करणे इत्यादीसाठी प्रवृत्त होईल. त्यामुळे मजीप्रा तांत्रिकदृष्ट्या अजून सक्षम होऊ शकेल. हायड्रॉलिक संकल्पने अधिक योग्य प्रकारे होऊ शकतील व सल्लागारांना देण्यात येणारी रक्कम वाचेल. असे करताना सदर अभियंत्यांना प्रत्येक संकल्पचित्रामागे एक विशिष्ट रक्कम प्रोत्साहन भत्याच्या स्वरुपात (Incentive) देण्याचे विचाराधीन आहे. यासर्व बाबींविषयीची माहिती संचालक मंडळास अवगत करण्यात आली. त्यावर सविस्तर चर्चा होऊन पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, मजीप्रामार्फत अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या पाणी पुरवठा व जलनि:सारण योजनांच्या हायड्रॉलिक मॉडेलिंगचे काम खाजगी सल्लागारांऐवजी मजीप्राकडील तत्सम कामाचा अनुभव असलेल्या अभियंत्यांकडून करुन घेण्यास व या कामासाठी प्रोत्साहन भत्ता म्हणून प्रत्येक योजनेच्या बाबतीत प्रती नोड रु.२०/- याप्रमाणे येणारी रक्कम किंवा जास्तीत जास्त रु.१ लक्ष यापैकी जी कमी असेल तेवढी रक्कम, संबंधित अभियंत्यास अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

या संदर्भात आवश्यक नियमावली व कार्यपध्दती ठरवून पुढील कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१०:** अमृत अभियानांतर्गत मलनि:सारण योजनांच्या हायड्रॉलिक मॉडेलिंग/ संकल्पन करण्याकरीता सॉफ्टवेअर खरेदी करणेबाबत.

**प्रस्तावना :**

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

- अमृत अभियानांतर्गत अंदाजे रु.३८०० कोटी किंमतीच्या मलनि:सारण योजना तयार करण्याचे नियोजित आहे. त्यामुळे सध्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नाशिक, औरंगाबाद विभागीय कार्यालय व ठाणे येथे मध्यवर्ती नियोजन संकल्पचित्र व संनियंत्रण कक्षासाठी मलनि:सारण योजनांचे संकल्पन करणेसाठी अशा तीन सॉफ्टवेअरची आवश्यकता आहे. प्रत्येक सॉफ्टवेअरची बाजारात अंदाजित किंमत रु.२० ते २५ लाख इतकी आहे. एकुण तीन सॉफ्टवेअरसाठीची अंदाजित किंमत रु.७५ लक्ष असणार आहे.
- सदर सॉफ्टवेअर हे अमर्यादित नोडस्‌साठी व अमर्यादित कालावधीकरीता वापर करता येणार आहे.
- सदर प्रस्तावावर सध्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्वनिधीमधून खर्च करणे प्रस्तावित आहे. अमृत अभियान अंतर्गत क्षमता बांधणीसाठी उपलब्ध तरतूदीमधून रु.११६ लक्ष इतका निधी प्राप्त करुन घेण्यासाठी स्वतंत्र प्रस्ताव शासनाच्या नगर विकास विभागाकडे सादर करण्यात आलेला

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

आहे. या प्रस्तावात एकूण ५ सॉफ्टवेअर खरेदी करणे अपेक्षित असून त्यानुसार रु.११६ लाख इतकी मागणी शासनाकडे करण्यात आली आहे. सदर निधी शासनाकडून प्राप्त झाल्यानंतर या प्रस्तावित सॉफ्टवेअरसाठीच्या खर्चाचे समायोजन करता येईल.

- सदर सॉफ्टवेअर वापरण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे अभियंतांना Hands on training ची आवश्यकता आहे. त्यासाठी सदर प्रस्तावात तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. सदर प्रशिक्षण १५ दिवसांच्या कालावधीसाठी असून त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अभियंत्यांची क्षमता बांधणी होऊन अमृत अभियानांतर्गत प्रस्तावित मलनि:सारण योजना तयार करणे शक्य होईल. मलनि:सारण प्रकल्पांकरीता संकल्पन व सिम्युलेशन सॉफ्टवेअर उपलब्ध झाल्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील उपलब्ध अभियंते रु.३८००/- कोटी अंदाजित किंमतीचे प्रकल्प अहवाल सक्षमपणे व यशस्वीरित्या तयार करु शकतील. त्याशिवाय केंद्र व राज्य शासनाच्या इतरही अनेक कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे प्राप्त होणाऱ्या मलनि:सारण योजनांचे प्रकल्प अहवाल सक्षमपणे तपासून तांत्रिक सहमती (Technical Appraisal) देता येईल तसेच संकल्पनेही तयार करता येतील. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे प्राप्त होणाऱ्या महसूलामध्येही वाढ होईल.
- सदर काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या व्यतिरिक्त इतर खाजगी सल्लागारास दिल्यास त्यासाठी अंदाजे रु.१०० लाख एका योजनेसाठी खर्च लागेल. ही बाब लक्षात घेता उपरोक्त सॉफ्टवेअर खरेदी करणे हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या हिताचे आहे.
- सन २०१५-१६ च्या कृती आराखड्यात समाविष्ट योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत तयार करण्यात आले असून त्यासाठी शासनाच्या नगर विकास विभागाकडून रु.७७८ लाख इतका निधी प्रकल्प सल्लागार व्यवस्थापन शुल्क म्हणून मंजूर करण्यात आला आहे. या मंजूर निधीतून मलनि:सारण योजनांचे संकल्पन व सिम्युलेशनच्या आवश्यक कामासाठी आवश्यक सॉफ्टवेअर (अंदाजित किंमत रु.७५ लाख) खरेदी करणे प्रस्तावित करण्यात आले होते. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, मलनि:सारण योजना संकल्पन व सिम्युलेशन करण्यासाठी आवश्यक असणारे तीन सॉफ्टवेअर सध्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला अमृत या योजनेत प्राप्त होणाऱ्या प्रकल्प सल्लागार सेवा पोटी प्राप्त झालेल्या निधीतून खरेदी करण्यासाठी व अभियंतांना Hands on training साठी मंजूरी देण्यात येत आहे. या बाबतीत विहीत पध्दतीने निविदा प्रक्रिया करुन त्यानुसार सॉफ्टवेअर खरेदीविषयी पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.११:** सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना.
वाहन चालकांच्या वेतनश्रेणीत सूधारणा करणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

मा.उच्च न्यायालयाच्या दि.१६/७/२०१५ च्या आदेशानुसार वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक याचिका-१०१२/प्र.क्र.७४/ सेवा-३ दि.३ मार्च, २०१६ अन्वये वाहनचालकांच्या वेतनश्रेणीत खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे.

**शासन निर्णय**

१. दि.२० जुलै, २००१ च्या शासन निर्णयासोबत परिशिष्ट एक मधील अ.क्र.५ येथील वाहनचालकांसाठीच्या रु.३०५०-७५-३९५०-८०-४५९० या पाचव्या वेतन आयोगातील सुधारित वेतनश्रेणीसाठी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत अनुज्ञेय असल्याचे दर्शविलेल्या रु.३२००-८५-४९०० या वेतनश्रेणीऐवजी रु.४०००-१००-६००० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे.

२. दि.१७ मे, २००३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२.२ व २.६ रद्द करण्यात आला आहे.

३. उपरोक्त अ.क्र.१ च्या शासन निर्णयाच्याअनुषंगाने संबंधित वाहनचालकांच्या पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीमध्ये रु.४०००-१००-६००० अशी सुधारणा झाल्याने, संबंधित वाहनचालकांची शासन अधिसूचना, वित्त विभाग दि.२२-४-२००९ मधील नियम १४(३) मधील तरतुदीनुसार सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनसंरचनेत सुधारित वेतननिश्चिती करण्यात आली आहे.

सदरहू शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.८९/२०१६/सेवा-९, दि.३/३/२०१६ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात आले आहे.

**म.जी.प्रा.चे अभिप्राय** :-

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक याचिका-१०१२/प्र.क्र.७४/ सेवा-३ दि.३ मार्च, २०१६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील वाहन चालकांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत वेतनश्रेणीत सुधारणा करावयाची झाल्यास ५ व्या वेतन आयोगाची सुधारित वेतनश्रेणी रु.३२००-४९०० वरुन रु.४०००-१००-६००० करण्यात आली आहे. त्यामुळे या सुधारित वेतनश्रेणीनुसार आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत ६ व्या वेतन आयोगाने रु.५२००-२०२०० ग्रेड पे रु.२४०० ही वेतनश्रेणी लागू केली असल्याने दि.१/१/२००६ पासून किंवा आश्वासित प्रगती योजनेचा प्रत्यक्ष लाभ ज्या दिनांकापासून अनुज्ञेय केला आहे त्या दिनांकापासून ग्रेड पे रु.२१०० एवढे अनुज्ञेय ठरते. सबब म.जी.प्रा.वर खालीलप्रमाणे वाढीव आर्थिक भार येईल.

| | | |
|---|---|---|
| १. | म.जी.प्रा.कडील वाहनचालकांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत रु.४०००-१००-६००० ही वेतनश्रेणी लागू करावयाची आहे असे वाहनचालक. (संख्या) | १७ वाहनचालक |
| २. | १७ वाहनचालकांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करावयाची झाल्यास येणारा वित्तीय भार | रु.७,००,०००/- |

वरीलप्रमाणे म.जी.प्रा.तील वाहनचालकांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत रु.४०००-१००-६००० ही सुधारित वेतनश्रेणी लागू केल्यास माहे फेब्रुवारी २००२ ते आजपर्यंतच्या फरकापोटी म.जी.प्रा.वर सुमारे रु.७,००,०००/- एवढा वाढीव आर्थिक भार व दरमहा रु.७,०००/- एवढा आर्थिक भार पडेल. हा वाढीव आर्थिक भार म.जी.प्रा.च्या ई ॲन्ड पी चार्जेस व महसुली उत्पन्नातून भागविण्यात येईल.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**प्रस्ताव :-**

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक याचिका-१०१२/प्र.क्र.७४/ सेवा-३ दि.३ मार्च, २०१६ अन्वये राज्य शासनाच्या वाहनचालकांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्यात आली आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील वाहन चालकांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करुन रु.४०००-१००-६००० ही सुधारित वेतनश्रेणी लागू केल्यास खालीलप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्याची बाब संचालक मंडळास अवगत केली.

| पदनाम | शासन निर्णय दि.२० जुलै, २००१ अन्वये वाहनचालकास देय ठरविण्यात आलेली वेतनश्रेणी | ५ व्या वेतन आयोगातील सुधारित वेतनश्रेणीसाठी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेली वेतनश्रेणी | पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्यात आलेली वेतनश्रेणी | ६ व्या वेतन आयोगानुसार रु.४०००-१००-६००० या वेतनश्रेणीस देय असलेली वेतन बॅन्ड व ग्रेड वेतन | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | वेतन बॅन्ड | ग्रेड वेतन |
| वाहन चालक | रु.३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ३२००-८५-४९०० | ४०००-१००-६००० | ५२००-२०२०० | २१०० |

शासन निर्णय क्र.याचिका-२०१२/प्र.क्र.७४/सेवा.३ दि.3 मार्च २०१६ मधील नियम क्र.३ मध्ये निर्देश दिल्यानुसार वाहनचालकाची शासन अधिसूचना वित्त विभाग दि.२२/४/२००९ नियम १४ (३) मधील तरतुदीनुसार सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन संरचनेत सुधारित वेतन निश्चिती करण्याचे आदेश आहेत. सदर नियमातील १४ (३) (अ) मध्ये खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

**नियम क्र.१४ (३):-** दि.१ जानेवारी, २००६ पूर्वी कालबध्द पदोन्नती अथवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळालेल्या व पदोन्नतीच्या संधी नसलेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीच्या विद्यमान वेतनश्रेणीस अनुज्ञेय वेतनबॅन्ड व ग्रेड वेतन मंजूर करण्यात येईल व त्यांची वेतननिश्चिती यथास्थिती नियम ७ किंवा नियम ११ नुसार करण्यात यावी. तसेच त्यांना खाली दिल्याप्रमाणे अतिरिक्त ग्रेड वेतनही अनुज्ञेय राहील.

अ) उक्त योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीच्या विद्यमान वेतनश्रेणीस अनुज्ञेय ग्रेड वेतन रु.२०००/- पर्यंत असल्यास अतिरिक्त ग्रेड वेतन रु.२००/-.

ब) उक्त योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीच्या विद्यमान वेतनश्रेणीस अनुज्ञेय ग्रेड वेतन रु.२०००/- पेक्षा जास्त व रु.४०००/- पेक्षा कमी असल्यास अतिरिक्त ग्रेड वेतन रु.३००/-.

क) उक्त योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीच्या विद्यमान वेतनश्रेणीस अनुज्ञेय ग्रेड वेतन रु.४०००/- पेक्षा जास्त व रु.५०००/- पेक्षा कमी असल्यास अतिरिक्त ग्रेड वेतन रु.४००/-.

ड) उक्त योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीच्या विद्यमान वेतनश्रेणीस अनुज्ञेय ग्रेड वेतन रु.५०००/- पेक्षा जास्त असल्यास अतिरिक्त ग्रेड वेतन रु.५००/-.

उपरोक्त नियमातील तरतुदीनुसार वाहनचालक हे पद एकाकी पद असल्याने त्यांना ५ व्या वेतन आयोगाप्रमाणे रु.४०००-६००० ही वेतनश्रेणी अनुज्ञेय केली आहे व सहाव्या वेतन आयोगानुसार ५२००-२०२०० ग्रेड वेतन रु.१९०० + २०० ही वेतनश्रेणी मंजूर केली आहे. ही बाब देखील संचालक मंडळाच्या निदर्शनास आणून देण्यात आली. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन होऊन प्रस्तावास मान्यता देण्यात आली व खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक याचिका-१०१२/प्र.क्र.७४/ सेवा-३ दि.३ मार्च, २०१६ अन्वये दि.२० जुलै, २००१ च्या शासन निर्णयासोबत परिशिष्ट एक मधील अ.क्र.५ येथील वाहनचालकांसाठीच्या रु.३०५०-७५-३९५०-८०-४५९० या पाचव्या वेतन आयोगातील सुधारित वेतनश्रेणीसाठी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत अनुज्ञेय असल्याचे दर्शविलेल्या रु.३२००-८५-४९०० या वेतनश्रेणीऐवजी रु.४०००-१००-६००० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली असून त्याच धर्तीवर म.जी.प्रा.तील पात्र ठरणा-या वाहनचालकांनाही रु.४०००-१००-६००० ही सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. त्यानुसार वाहनचालकांना खालीलप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्याबाबतची पुढील कार्यवाही शासन मान्यतेने करण्यास मा.सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

| पदनाम | शासन निर्णय दि.२० जुलै, २००१ अन्वये वाहनचालकास देय ठरविण्यात आलेली वेतनश्रेणी | ५ व्या वेतन आयोगातील सुधारित वेतनश्रेणीसाठी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेली वेतनश्रेणी | पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्यात आलेली वेतनश्रेणी | ६ व्या वेतन आयोगानुसार रु.४०००-१००-६००० या वेतनश्रेणीस देय असलेली वेतन बॅन्ड व ग्रेड वेतन | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | वेतन बॅन्ड | ग्रेड वेतन |
| वाहनचालक | रु.३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ३२००-८५-४९०० | ४०००-१००-६००० | ५२००-२०२०० | २१०० |

**कार्यक्रम बाब क्र.१२:** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवेत असताना मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नेमणुक देण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास खालील प्रमाणे अवगत केले. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्र. पदनि-२०१२/प्र.क्र.१५/१२/वित्तिय सुधारणा-१ दिनांक २२ मार्च २०१२ अन्वये अनुकंपा तत्वावरील नियुक्तीच्या पदभरतीवरील निर्बंध शिथिल करुन शासन स्तरावरील अनुकंपाधारकांना नियुक्त्या देण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.अकंपा-१०९३/प्र.क्र.९०/९३/आठ, दि.२६ ऑक्टोबर, १९९४ अन्वये शासन सेवेत असतांना मृत्यू पावलेल्या गट-क व गट-ड मधील कर्मचा-यांचे वारसास शासन सेवेतील गट-क व ड संवर्गातील रिक्त पदावर नियुक्तीकरिता अनुकंपा तत्वावर नियुक्तीची योजना लागू करण्यात आली आहे.

शासन निर्णय सा.प्र.वि.क्र.अकंपा-१००४/प्र.क.५१/२००४/आठ, दि.२२.८.२००५ अन्वये अनुकंपा नियुक्तीच्या प्रचलित कार्यपध्दती व योजनेच्या तरतुदीत सुधारणा करण्यात येऊन गट-क व गट-ड मधील प्रतिवर्षी रिक्त होणा-या पदांच्या ५% पदांवर अनुकंपा प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना नियुक्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाचे पत्र क्र.ACT-1382/48/CR 241/UD.15, Dated 21st January, 1984 च्या अनुषंगाने उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदी मजीप्रास ही लागू असल्याने मजीप्राच्या आस्थापनेवरील गट-क

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

व गट-ड मधील जे कर्मचारी सेवेत असतांना मृत्यू पावले आहेत, त्यांच्या वारसास मजीप्राच्या आस्थापनेवरील रिक्त गट-क व गट-ड मधील पदावर सन २००० पूर्वी नियुक्ती देण्यात येत होती. तथापि, महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्र क्र बीजीटी-१०००/प्र.क्र.१३/२०००/अर्थसंकल्प-१९, दिनांक १ मार्च, २००० अन्वये राज्य शासनाने सेवानिवृत्ती/स्वेच्छा, सेवानिवृत्ती/राजीनामा/मृत्युमुळे रिक्त होणारी पदे भरण्यावर बंदी घातली होती. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे आदेश क्र.आस्था-१०२०/(९३)/आ.१, दिनांक ८ मार्च, २००० अन्व्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सेवानिवृत्ती/स्वेच्छा सेवानिवृत्ती/राजीनामा/मृत्युमुळे रिक्त होणा-या पद भरतीवर निर्बंध लागू केले आहेत व मजीप्राचे परिपत्रक क्र.मजीप्रा/२०१५/स.से.पदे/बंदी/ईटी-४०६/आस्था-१, दिनांक १०.७.२०१५ अन्वये सदर पद भरतीवरील निर्बंध यापुढेही कायम ठेवण्यात आले आहेत.

मजीप्राची आर्थिक स्थिती बिकट असल्याने व काही संवर्गात कर्मचारी अतिरिक्त ठरल्याने सन २००० नंतर मजीप्रामध्ये अनुकंपा नियुक्ती तसेच अन्य सर्व नियुक्त्यांवर (म.लो.आ.मार्फत करावयाच्या सरळसेवा भरतीची पदे वगळून) बंदी घालण्यात आली होती. त्यामुळे उपरोक्त अनुकंपा भरतीवरील नियुक्तीबाबतच्या शासन निर्णयाप्रमाणे मजीप्रामध्ये अनुकंपा तत्वावरील नियुक्तीची कार्यवाही करण्यात आली नाही.

तसेच, शासन निर्णय सा.प्र.वि.क्र.अकंपा-१००४/प्र.क्र.५१/२००४/आठ, दि.२२.८.२००५ मध्ये सुधारणा करुन शासन निर्णय सा.प्र.वि.क्र.अकंपा-१०१४/प्र.क्र.३४/८, दि. १ मार्च, २०१४ अन्वये ५% ची मर्यादा वाढवून १०% एवढी करण्यात आली आहे व विहित १०% मर्यादेत नियुक्ती देण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

तथापि, मजीप्राची आर्थिक स्थिती बिकट असल्याने व काही संवर्गात कर्मचारी अतिरिक्त ठरल्याने सन २००० नंतर मजीप्रामध्ये अनुकंपा नियुक्ती तसेच अन्य सर्व नियुक्त्यांवर (म.लो.आ.मार्फत करावयाच्या सरळसेवा भरतीची पदे वगळून) बंदी घालण्यात आली होती. त्यामुळे उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे अनुकंपा तत्वावरील नियुक्तींबाबतची कार्यवाही मजीप्रामार्फत करण्यात आली नाही.

मजीप्राच्या क्षेत्रिय कार्यालयांतर्गत परिमंडळनिहाय गट-क व गट-ड चे खालीलप्रमाणे अनुकंपा उमेदवार सध्या नेमणूकीच्या प्रतिक्षेत आहेत.

| **अ.क्र.** | **परिमंडळाचे नांव** | **गट-क अर्हताप्राप्त** | **गट-ड** | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | ४६ | ३९ | ८५ |
| २ | पुणे | १३ | १८ | ३१ |
| ३ | नाशिक | ६७ | २८ | ९५ |
| ४ | औरंगाबाद | ४७ | ४५ | ९२ |
| ५ | नागपूर | १३८ | ६४ | २०२ |
| | **एकूण** | **३११** | **१९४** | **५०५** |

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील मृत कर्मचा-यांचे वारसाकडून अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या मिळण्याबाबत वारंवार अर्ज, तक्रारी, उपोषणे, निदर्शने करण्यात येतात. तसेच मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री, राजकीय प्रतिनिधी यांच्यामार्फत अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या करण्याबाबत सतत पाठपुरावा करीत असल्याने अनुकंपा

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

प्रतिक्षा यादीतील वारसांना शासनाच्या सेवेतील गट-क व ड मधील रिक्त पदांवर नेमणूक देण्यासाठी प्रस्ताव पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत सामान्य प्रशासन विभागास सादर करण्यात आला होता. सामान्य प्रशासन विभागाने मजीप्राच्या प्रस्तावास मान्यता देण्यासाठी तत्कालीन राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता श्री.रणजित कांबळे यांनी सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेबरोबर बैठक आयोजित केली होती. तथापि, शासन सा.प्र.वि.चे पत्र क्र.अकंपा-१०१३/प्र.क्र.६३/का.८, दिनांक २२ एप्रिल, २०१३ अन्वये मजीप्राचा प्रस्ताव मजीप्रातील कर्मचारी शासकीय कर्मचारी नाहीत, असे ठरवून मजीप्रातील मृत कर्मचा-यांची वारसांना शासन स्तरावरील गट-क व गट-ड मधील रिक्त पदांवर नियुक्ती देण्याचे नाकारले. तद्नंतर पुन्हा मजीप्राचे पत्र क्र.मजीप्रा-२०१२/अनुकंपा/नेमणूक/२०४/आस्था-३, दिनांक ३१.१०.२०१३ तसेच दि.३०.१२.२०१४ अन्वये शासनाकडील व जिल्हाधिकारी कार्यालयाकडील अनुकंपाधारकांच्या प्रतिक्षायादीमध्ये मजीप्रामधील दिवंगत कर्मचा-यांच्या कुटुंबियांची नांवे समाविष्ट करुन त्यांना शासन स्तरावरुन नेमणूका देण्याबाबत सामान्य प्रशासन विभागास शिफारस करावी, असा प्रस्ताव पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास सादर केला होता. सदर प्रस्ताव व फेरप्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायानुसार पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे दिनांक १२.२.२०१५ चे पत्रान्वये नाकारण्यात आला.

सध्या मजीप्राच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांच्या सेवानिवृत्ती, स्वेच्छानिवृत्ती, राजीनामा व मृत्यू इत्यादी कारणास्तव कर्मचा-यांची संख्या दिवसेंदिवस कमी कमी होत आहे. त्यामुळे रिक्त होणा-या पदांमुळे कार्यालयीन कामकाज अपु-या संख्येच्या कर्मचा-यांकडून करुन घेणे दिवसेंदिवस अडचणीचे होत आहे. यास्तव लिपीक-टंकलेखक या पदांवर भरती करणे आवश्यक झाले आहे.

म.जी.प्रा.च्या क्षेत्रीय कार्यालयांतर्गत गट-क या संवर्गातील मंजूर, भरलेली व रिक्त पदे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | परिमंडळाचे नांव | गट-क | | |
|---|---|---|---|---|
| | | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
| १ | ठाणे | ४९७ | ३२१ | १७६ |
| २ | पुणे | ३०९ | १२८ | १८१ |
| ३ | नाशिक | २०४ | १३७ | ६७ |
| ४ | औरंगाबाद | २४१ | १३९ | १०२ |
| ५ | नागपूर | २४२ | १६९ | ७३ |
| | **एकुण** | **१४९३** | **८९४** | **५९९** |

वरील रिक्त ५९९ पदांमध्ये लिपीक-टंकलेखकांची **१०६** पदे रिक्त आहेत. ही रिक्त पदे मजीप्रामधील गट-क संवर्गातील निवृत्तीचे प्रमाण विचारात घेता त्वरित भरणे आवश्यक झाले आहे.

मजीप्रामध्ये गट-क मधील पदांवर सन २००० पासून सरळसेवा भरती झालेली नाही. त्यातच विहित ४५ वर्षापेक्षा जास्त वय झाल्याने प्रतिक्षा यादीतील अनुकंपा उमेदवार नियुक्तीस अपात्र ठरत आहेत.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.पदनि-२०१२/प्र.क्र.१५१२/वित्तीय सुधारणा-१, दिनांक २२ मार्च, २०१२ अन्वये अनुकंपा तत्वावरील नियुक्तीच्या पदभरतीवर निर्बंध शिथिल करण्यात आले आहेत. महाराष्ट्र

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.अकंपा-१०१४/प्र.क्र.३४/आठ, दिनांक १ मार्च, २०१४ अन्वये दिनांक २२.८.२००५ नुसार अनुकंपा नियुक्तीसाठी गट-क आणि गट-ड मध्ये प्रतिवर्षी रिक्त होणा-या पदांच्या ५% इतकी भरती करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

उपरोक्तप्रमाणे लिपीक टंकलेखक पदांची रिक्त संख्या विचारात घेऊन गट-क मधील लिपीक-टंकलेखकांच्या १०६ रिक्त पदांच्या १० टक्के पदे म्हणजेच ११ पदांवर अनुकंपा प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची त्या त्या प्रादेशिक विभागातील रिक्त पदांवर नियुक्ती देण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता यांनी चर्चे दरम्यान असे निदर्शनास आणले की, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभागाकडून अनुकंपा नियुक्ती बाबत निर्गमित करण्यात आलेल्या सुचनांचे पालन करण्यात यावे. तसेच अनुकंपा प्रतिक्षा यादितील उमेदवांरांनी अनुकंपा प्रतिक्षा यादी अद्ययावत नसुन त्यात अद्यापही सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पाल्याचा समावेश आहे. त्यामुळे अनुकंपा प्रतिक्षा यादी शासन निर्देशानुसार अद्यावत करण्यात यावी. वरील प्रमाणे चर्चा होऊन सर्व संमतीने सदर अनुकंपा भरतीचा प्रस्ताव मान्य करण्यात येवून खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव :-** असा ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्र. पदनि-२०१२/ प्र.क्र.१५/१२/वित्तिय सुधारणा-१ दिनांक २२ मार्च २०१२ अन्वये अनुकंपा तत्वावरील नियुक्तीच्या पदभरतीवरील निर्बंध शिथिल करुन शासन स्तरावरील अनुकंपाधारकांना नियुक्त्या देण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

मागील १४ ते १५ वर्षात म.जी.प्रा.मध्ये गट-क व गट-ड संवर्गात सेवाभरती झाली नाही. तसेच या १५ वर्षात मोठ्या प्रमाणात गट-क मधील कर्मचारी निवृत्त झाल्याने याचा दैनंदिन कामकाजावर परिणाम झाला असल्याने लिपिक टंकलेखकांची रिक्त पदे भरणे आवश्यक झाले आहे. ही बाब विचारात घेऊन दिनांक २२ मार्च २०१२ च्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील लिपिक-टंकलेखक पद भरतीवरील निर्बंध शिथिल करुन गट-क मधील लिपिक-टंकलेखकांच्या एकूण रिक्त पदांच्या १०% पदांवर अनुकंपा तत्वावर नियुक्ती करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

याबाबतची पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१३:** सन २०१४-२०१५ चा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा वार्षिक लेखा मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सन २०१४-२०१५ चा वार्षिक लेखा मा. संचालक मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर करण्यात आला. वार्षिक लेख्याबाबत सविस्तर माहिती संचालक मंडळास देण्यात आली.

चर्चेअंती सन २०१४-२०१५ चा वार्षिक लेख्यास मा.संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली व खालीलप्रमाणे ठराव पारित केला.

**ठराव :**

१) ठराव करण्यात येत आहे की, सन २०१४-२०१५ या वर्षाचे वार्षिक लेखे स्विकृत करण्यात आले आहेत.

२) असाही ठराव करण्यात येत आहे की, सन २०१४-२०१५ या वर्षाचे वार्षिक लेखे प्राधिकरणाच्या वतीने अध्यक्ष व सदस्य सचिव, यांनी प्रमाणित करावेत.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

३) तसेच असाही ठराव करण्यात येतो की, स्वीकृत लेख्यांमध्ये मांडण्यात आलेल्या कामाच्या निष्कर्षामध्ये ज्यांच्यामुळे कोणताही महत्वाचा फरक पडणार नाही, अशा किरकोळ स्वरुपाच्या दुरुस्त्या प्राधिकरणाच्या संचालक (वित्त) व सदस्य सचिव, यांच्या स्वाक्षरीने करता येतील.

४) स्वीकृत लेखा महालेखापाल मुंबई, यांना लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन देणे इ. साठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

मंजूरी देण्यात येत आहे. याबाबतची पुढील कार्यवाही शासन मान्यतेने करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्या वेळेची चर्चा** : नगरपालिकेच्या विकास कामांना तांत्रिक मंजुरी प्रदान करण्याबाबत. प्रचलित शुल्कात वाढ करणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीविषयी सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. नगरपालिका आपल्या हद्दीत जी बांधकामे करतात, उदा. शाळा, पुल, रस्ते, समाज मंदिर, दवाखाना इ. साठी "अ" व "ब" वर्ग नगरपालिकांना रु.२०,०००/- पेक्षा जास्त व "क" वर्ग नगरपालिकांना रं.१०,०००/- पेक्षा जास्त किंमत असलेल्या अंदाजपत्रकांना, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ च्या कलम-७२ अन्वये तांत्रिक मंजुरी शासकीय विभागाकडून घ्यावी लागते. माहे नोव्हेंबर, १९८९ पर्यंत अशा प्रकारची तांत्रिक मंजुरी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत (तत्कालिन महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ) दिली जात होती. त्यावेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाणी पुरवठा व जलनि:सारण योजनांची कामे फार मोठ्या प्रमाणावर होती. त्यामुळे नगरपालिकांच्या पाणी पुरवठा व जलनि:सारणाच्या कामाव्यतिरिक्त इतर बांधकामांना तांत्रिक मंजुरी देणे अशक्य होत असे म्हणून त्यावेळी सदरचे तांत्रिक मंजुरीचे काम काढून घेण्याची विनंती शासनाकडे करण्यात आली होती.

यावर शासनाने असे आदेश दिले होती की, जोपर्यत पर्यायी व्यवस्था होत नाही, तोपर्यत नगरपालिकांच्या बांधकामांना तांत्रिक मंजूरी देण्याचे काम मंडळाच्या अधिकाऱ्यांनी चालू ठेवावे. याबाबत विचारांती शासनाने शासन निर्णय काढून "अ" व "ब" वर्ग नगरपालिकांच्या बांधकामांना तांत्रिक मंजुरी देण्याचे काम मजीप्राने व "क( वर्ग नगरपालिकांच्या बांधकामांना त्या-त्या जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागांने तांत्रिक मंजुरी देण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. शासनाने दिलेलया या निर्णयानुसार "अ" व "ब" वर्ग नगरपालिकांच्या बांधकामांना तांत्रिक मंजुरी देण्याचे काम मजीप्रा मार्फत सुरु आहे.

सदर तांत्रिक मंजुरीसाठी आकारवयाची फी ही त्यावेळी घेतलेल्या धोरणानुसार, अंदाजित किंमतीच्या ०.५% अनुज्ञेय करण्यात आली होती. त्याबाबतचा तर्क महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियिम पुस्तिकेच्या परिशिष्ट-७ नियम -१० च्या तरतुदीनुसार प्रकल्प तयार करण्याची फी 2% घ्यावी व बाहेरील संस्थेने तयार केलेल्या अंदाजपत्रकाची छाननी करण्यासाठी अंदाजपत्रक तयार करावयाच्या शुल्काच्या 25% ( 2% चे 25% म्हणजेच ०.५% )घ्यावी असा होता. सदर परिशिष्टातील नियम - १० हा स्थानिक संस्थांच्या सार्वजनिक आरोग्य विषयक योजनांसाठी म्हणजेच पाणी पुरवठा व जलनि:सारण योजनेच्या तांत्रिक मंजुरीसाठी आकारावयाच्या शुल्कापोटी आहे. तथापि, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे "अ" व "ब" वर्ग नगरपालिकांच्या पाणी पुरवठा व जलनि:सारण योजनांच्या कामांव्यतिरिक्त विकास कामांची अंदाजपत्रके व आराखडे देखील तांत्रिक मंजुरीसाठी प्राप्त होतात. सद्य:स्थितीत "क" वर्ग नगरपालिकांच्या बांधकामांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून देण्यात येत असलेल्या तांत्रिक छाननीपोटीचे शुल्क हे अंदाजित खर्चाच्या १¼ % (सव्वा टक्के) इतके आकारण्यात येत आहे. त्याच धर्तीवर मजीप्राने स्वत:च्या शुल्कात वाढ करावी किंवा कसे, याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. चर्चेअंती

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

सद्य:स्थितीमध्ये लागू असलेल्या तांत्रिक मान्यता शुल्काबाबत मा.संचालक मंडळाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

उपरोक्त नमूद बाबी व मजीप्राचा सध्याचा कार्यभार विचारात घेऊन मजीप्राकडून आकारण्यात येत असलेल्या पूर्वीच्या ०.५% शुल्कात दोन वेळा मा. संचालक मंडळाच्या १२१व्या व १३०व्या बैठकीत ०.८५% व १% पर्यंत वाढ करण्यात आली आहे. याप्रमाणे सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकास कामाच्या अंदापत्रके व आराखड्यांना १% इतके शुल्क आकारण्यात येत आहे. शुल्कामध्ये वाढ केल्यास मजीप्राचा कार्यभार कमी होण्याची शक्यता असल्याने सद्य:स्थितीत शुल्काची वाढ करण्यात येऊ नये, असा निर्णय घेण्यात आला.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.१** : माहिती व तंत्रज्ञान कक्ष, म.जी.प्रा. ठाणे या कक्षात आय.टी. तज्ञांची पदे निर्माण करणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीविषयी सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

जागतिकीकरण व त्याअनुषंगाने पाणी पुरवठा व मलनि: सारण क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान म.जी.प्रा.ने स्विकारण्याची गरज लक्षात घेऊन, म.जी.प्रा.च्या संगणकावरील संकेतस्थळ अद्यावत ठेवणे, संगणकावर सर्व कर्मचाऱ्यांची माहिती अद्यावत ठेवणे, हायड्रोलिक मॉडेलिंग, जी.आय.मॅपींग तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कामे मिळविणे व अशा तंत्रज्ञानाचा विकास करणे,ग्रामीण व नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी वेब बेसड् माहिती व्यवस्थापन प्रणाली विकसित करणे इ. महत्वाची कामे जी म.जी.प्रा. स व शासनास उपयोगी पडतील अशी कामे, सध्या म.जी.प्रा.तील १ उप अभियंता व १ सहा.अभियंता श्रेणी- २ या स्थापत्य श्रेणीतील अभियंत्याकडून करुन घेण्यात येत आहेत.

तथापि, सदर अभियंत्यांना केवळ एम.एस.- सी.आय.टी. प्रशिक्षणाद्वारे घेतलेले ज्ञानच अवगत आहे. त्याचबरोबर आय.टी.क्षेत्रातील शैक्षणिक अर्हता व अनुभव नसल्याने, सद्य:स्थितीत या कामाकरीता नेमण्यात आलेल्या सल्लागाराकडून/ कंत्राटदाराकडून कामे करुन घेणे व त्याचा योग्य तो अन्वयार्थ लावणे जिकीरीचे होत आहे. अशा परिस्थितीत उपरोक्त परिच्छेदात नमुद केल्यानुसार माहिती व तंत्रज्ञान कक्षामध्ये आय.टी. तज्ञ व कनिष्ठ आय.टी. तज्ञ पदाची निर्मिती करणे व सदर पदे भरण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठीचा प्रस्ताव कार्यक्रम बाबीचा मा.संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला.

- जागतिकीकरण व त्याअनुषंगाने पाणी पुरवठा व मलनि: सारण क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान म.जी.प्रा.ने स्विकारण्याची गरज लक्षात घेऊन, म.जी.प्रा.च्या संगणकावरील संकेतस्थळ अद्यावत ठेवणे, संगणकावर सर्व कर्मचाऱ्यांची माहिती अद्यावत ठेवणे, हायड्रोलिक मॉडेलिंग, जी.आय.मॅपींग तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कामे मिळविणे व अशा तंत्रज्ञानाचा विकास करणे,ग्रामीण व नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी वेब बेस्ड माहिती व्यवस्थापन प्रणाली विकसित करणे इ. कामासाठी, यापूर्वी मध्यवर्ती कार्यालयाच्या मध्यवर्ती नियोजन संकल्पचित्र व सनियंत्रण (सी.पी.डी.एम.) कक्षात "माहिती व तंत्रज्ञान" स्थापण्यात आला होता. तद्‌नंतर सदर कक्ष म.जी.प्रा.च्या मा. सदस्य सचिवांच्या थेट प्रशासकीय नियंत्रणाखाली दि. १२ जून, २००९ च्या कार्यालयीन आदेश क्र.मजीप्रा / सस/ २००९/आ-७ अन्वये आणण्यात आला.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

- म.जी.प्रा.च्या दि. ३ नोव्हेंबर, २०११ च्या कार्यालयीन आदेश क्र.इएसटी-२०११/सीआर-१२०/आ-७ अन्वये म.जी.प्रा. च्या तत्कालीन प्रचलित प्रशासकीय रचनेत अंतर्गत बदल करुन (व्हर्टीकल्स) कार्यालये कार्यरत झाल्यानंतर मध्यवर्ती कार्यालयाच्या मित्तल टॉवर्स येथे, मध्यवर्ती कार्यालयाचे एक्सप्रेस टॉवर्स, मित्तल टॉवर्स व सिडको भवन, नवी मुंबई या कार्यालयांची दैनंदिन देखभाल दुरुस्ती, निविदा मागविणे, संगणक खरेदी, माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित सर्व प्रकारची कामे करण्यासाठी "माहिती व तंत्रज्ञान" या स्वतंत्र कक्षाची निर्मीती दि. ५.६.२०१२ च्या जा. क्र. इएसटी-२०११/सीआर-१२०/आ-७ च्या आदेशानुसार करण्यात आली. **(सुलभ संदर्भासाठी आदेशाची प्रत सोबत सादर केली आहे.)** सदर आदेशानुसार या कक्षात कार्यकारी अभियंता (स्था) यांच्या अधिपत्याखाली म.जी.प्रा.च्या अंधेरी येथील उप विभाग जोडण्यात आला. सदर आदेशाचे अवलोकन केले असता, या कक्षाकडे एकूण २३ पदे देण्यात आली होती.

- तथापि, मध्यवर्ती कार्यालयातील त्यावेळच्या कामाचे स्वरुप विचारात घेऊन, मित्तल टॉवर्स येथील भाडयाची जागा असल्याने, कमी जागेत अधिकारी व कर्मचाऱ्यांना बसण्याची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आल्याने, सदर कक्ष बंद करण्याचा धोरणात्मक निर्णय दि. २९.१०.२०१२ च्या जा. क्र. इएसटी-२०११/सीआर-१२०/आ-७ च्या आदेशानुसार घेण्यात आला. **(सुलभ संदर्भासाठी आदेशाची प्रत सोबत सादर केली आहे.)** त्यानुसार दि. ५.६.२०१२ च्या कार्यालयीन आदेशातील नमुद माहिती व तंत्रज्ञान कक्षातील ६ व मध्यवर्ती कार्यालयातील या कक्षाकडे वर्ग करण्यात आलेली ४ पदे अधीक्षक अभियंता म.नि.सं.व स. कक्षाकडे त्यांच्या कार्यभारासह वर्ग करण्यात आली असून, त्यांच्याकडून माहिती तंत्रज्ञान कक्षाशी निगडीत कामे करुन घेण्यात येत होती.

- दि. ३ नोव्हेंबर, २०११ च्या कार्यालयीन आदेश क्र.इएसटी-२०११/सीआर-१२०/आ-७ अन्वये म.जी.प्रा. च्या तत्कालीन प्रचलित प्रशासकीय रचनेत अंतर्गत बदल करुन कार्यरत झालेली कार्यालये (व्हर्टीकल्स) पुन:श्च दि.२९.४.२०१५ च्या आदेश क्र.मजीप्रा/इएसटी-२०१४/सीआर-४३/आ-७ अन्वये पुन:श्च पुर्वीप्रमाणेच म्हणजे महसूल विभागनिहाय मुख्य अभियंता यांची कार्यालये कार्यान्वित करण्यात आली आहेत. सदर आदेश विचारात घेऊन, दि. २४.६.२०१५ च्या कार्यालयीन आदेश क्र.मजीप्रा/२०१५/गुपप/वे.भ./ईटी-४०४/आ-१ अन्वये या कक्षाचे नियंत्रण अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. गु.प.प. मित्तल टॉवर्स, मुंबई यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. त्यानुसार आता सदर कार्यालय हे ठाणे येथे कार्यरत आहे.

**सद्य:स्थितीतील कार्यभार :**

**सद्य:स्थितीत या कार्यालयाकडे सोपविण्यात आलेला कार्यभार पुढीलप्रमाणे आहे.**

१. म.जी.प्रा.चे संकेतस्थळ अद्यावत ठेवणे.
२. विविध ऑन लाईन रिपोर्टीग सिस्टम ॲप्लीकेशनस् आय.टी. सेक्टरल एजन्सीकडून तयार करुन घेणे. सदर ॲप्लीकेशन स्टेट डेटा सेंटरवर मायग्रेट करणे. त्यासाठी एस.डी.सी., डी.आय.टी व एन.आय.सी. संस्थेच्या अधिकाऱ्यांशी संपर्क ठेवणे.
३. म.जी.प्रा.साठी ई-मेल सोल्युशन्स् तयार करणे.
४. म.जी.प्रा.च्या पाणी पुरवठा केंद्राच्या ग्राहकांसाठी स्विकारलेल्या ई-पेमेन्ट गेटवेसाठी फ्रन्ट एन्ड ॲप्लीकेशन तयार करणे.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

५. म.जी.प्रा.च्या विविध कार्यालयासाठी ई-टेंडरकरीता डीजीटल की प्राप्त करुन घेणे.
६. ऑनलाईन आर.टी.आय. सुविधा प्राप्त करुन घेणे.
७. अधिकारी / कर्मचाऱ्यांचे सेवा पुस्तक www.ehrms.nic.in या संकेत स्थळावर अद्यावत ठेवणे.
८. आवश्यक असलेल्या स्वॉफ्ट वेअर व हार्ड वेअरचा पुरवठा करुन घेणे.
९. राज्यातील ग्रामीण व प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचा डाटा बेस अनुक्रमे (९६ कॉलम) व आर.आर. डाटा बेस तयार करणे.

सद्य:स्थितीत सदर कक्षाकडील उपरोक्त नमुद कामे म.जी.प्रा.तील १ उप अभियंता व १ सहा.अभियंता श्रेणी- २ या **स्थापत्य श्रेणीतील** अभियंत्याकडून करुन घेण्यात येत आहेत. तथापि, सदर कामांचा विचार करता, माहिती व तंत्रज्ञान कक्षामध्ये १ आय.टी. तज्ञ (आय टी स्पेशालिस्ट) व कनिष्ठ आय.टी. तज्ञ (ज्युनिअर आय. टी. स्पेशालिस्ट) पदाची निर्मिती करणे व सदर पदे भरणे अत्यावश्यक झाले आहे. त्याची मुख्य कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

१. अस्तित्वातील अभियंते हे केवळ स्थापत्य शास्त्राचा अनुभव असलेले आहेत.
२. आय.टी.क्षेत्रासाठी शैक्षणिक अर्हता व अनुभव नसल्याने आय.टी.कामासाठी सद्य:स्थितीत नेमण्यात आलेल्या सल्लागारांकडून / कंत्राटदाराकडून कामे करुन घेणे व त्याचा योग्य तो अन्वयार्थ लावणे, अस्तित्वातील स्थापत्य अभियंत्यांना शक्य होत नाही.
३. सध्या कार्यरत अभियंत्यांना आय.टी. क्षेत्राचा केवळ जुजबी अनुभव असल्याने व सदरचा अनुभव इतर अभियंत्यांना नसल्याने, बदलीसाठी पात्र असुनही सदर अभियत्यांना बदलीविना कायमस्वरुपी याच कक्षात काम करावे लागते. त्यामुळे त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार पदस्थापनेच्या कामातील सर्वांगिण अनुभवापासून वंचित रहावे लागून अन्यायकारक होत आहे.

त्यामुळे उपरोक्त नमुद सर्व बाबींच्या अनुषंगाने माहिती व तंत्रज्ञान कक्षामध्ये १ आय.टी. तज्ञ व २ कनिष्ठ आय.टी. तज्ञ पदे भरण्याकरिता खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात आले होते.

६ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन श्रेणी व वेतन संरचना म.जी.प्रा.च्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी दि.२७ ऑगस्ट,२००९ च्या शासन निर्णय क्र. इएसटी-२००९/प्र.क्र.१५६/पापु-२३ अन्वये मंजूरी प्रदान केली आहे. सदर शासन निर्णयाचे अवलोकन केले असता, परिशिष्ट अ च्या अनु.क्र.२० मध्ये कॉम्प्युटर प्रोग्रामर पदाची वेतन संरचना (१५०००-३९१०० ग्रे.पे. ५४००) मंजूर आहे. तथापि, सदरचे पद मजीप्रामध्ये अद्याप भरलेले नाही. त्याचबरोबर उर्वरित २ कनिष्ठ आय.टी. तज्ञ ही पदे नव्याने निर्माण करुन त्यासही शासनाची मान्यता घ्यावी लागेल. त्यासाठीचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा लागेल व त्यास बराच कालावधी जाईल. किंबहुना सद्य:स्थितीत अशी नवीन पदे निर्माण करणे वा मंजूर करण्यासही मनाई आहे.

अशा परिस्थितीत म.जी.प्रा. अंतर्गत या तीनही पदासाठी लागू होऊ शकणा-या वेतन श्रेणीच्या समकक्षेत येणारी म.जी.प्रा.तील पदे रुपांतरित करण्याचे प्रस्तावित आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

म.जी.प्रा., जिल्हा परिषदा व इतर प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांचा तपशिल सोबत सादर करण्यात येत आहे. त्याचे अवलोकन केले असता, अनु.क्र.८ उप अभियंता (स्था.) साठी एकूण २४१ पदे मंजूर असून, (मंजूर वेतन श्रेणी १५६००-३९१०० ग्रे.पे. ५४०० अशी आहे. जी दि. २७.८.२००९ च्या शासन निर्णयामधील कॉम्प्युटर प्रोग्रामरसाठी लागु आहे) त्यापैकी कार्यरत २०४ असून, ३७ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

३७ पदांमधून १ पद आय.टी. तज्ञ म्हणून वर्ग करणे. त्याचबरोबर अनु. क्र. २५ कनिष्ठ अभियंतांची ७०७ पदे मंजूर असून सुधारित आकृतीबंधानुसार म.जी.प्रा.स ५४५ पदांची आवश्यकता आहे. सद्य:स्थितीत ७९९ अभियंते कार्यरत असले तरी म.जी.प्रा.मध्ये ५१३ अभियंते कार्यरत आहेत. म.जी.प्रा.स आवश्यक ५४५ पदांचा विचार करता १६२ अभियंत्यांची पदे अतिरिक्त ठरणार आहेत. या १६२ अतिरिक्त ठरणाऱ्या (मंजूर वेतन श्रेणी ९३००-३४८०० ग्रे.पे. ४३०० अशी आहे) पदांमधून २ पदे कनिष्ठ आय.टी. तज्ञ म्हणून रुपांतरीत करणे शक्य आहे.

सदर पदे भरावयाची झाल्यास, त्यासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव व कर्तव्य आणि जबाबदारी इ. दर्शविणारे स्वतंत्र परिशिष्ट सोबत सादर करण्यात येत आहे.

सबब, सदर ३ पदे रुपांतरीत करण्यास मा. संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सदर प्रस्ताव सादर करण्यात येत असल्याचे मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळाच्या निदर्शनास आणले. यावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावास मान्यता देण्यात आली व खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की,

१. दि. २४.६.२०१५ च्या कार्यालयीन आदेश क्र.मजीप्रा/२०१५/गुपप/वे.भ./ईटी-४०४/आ-१ अन्वये माहिती तंत्रज्ञान कक्षाचे नियंत्रण अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. गु.प.प. (सध्याचे गुणवत्ता परिक्षण व दक्षता पथक ) यांच्याकडे असून, सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या या कक्षामध्ये आय.टी. क्षेत्रातील कोणतेही तज्ञ कार्यरत नसल्याने सध्या कार्यरत असलेल्या स्थापत्य अभियंत्या ऐवजी , प्रस्तावित केल्यानुसार १ आय.टी. तज्ञ व २ कनिष्ठ आय.टी. तज्ञांची पदे सध्याच्या मंजूर उप-अभियंता व कनिष्ठ अभियंता या पदांमधून रुपांतरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर रुपांतरीत करण्यात आलेल्या आय.टी. तज्ञ - १ पद व कनिष्ठ आय.टी. तज्ञ - २ पदांवर बाहयस्त्रोत पध्दतीने (Out Sourcing) निश्चीत वेतनावर NICST किंवा तत्सम निश्चित केलेले दर विचारात घेऊन नियुक्ति करण्याची कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.२** : केंद्रशासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत अमरावती पाणी पुरवठा योजना मंजूर वित्तीय आकृतीबंधामधील २५% हिस्सा मजीप्रामार्फत उभारणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीविषयी सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सदर केंद्र पुरस्कृत अमृत अभियांनांतर्गत अमरावती पाणी पुरवठा योजनेच्या मंजूर वित्तीय आकृतीबंधाप्रमाणे 25% हिस्सा मजीप्राने उभारणेबाबतचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

**अ) मंजूर योजनेचा तपशील :-**

- सदर योजनेस महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभागाचे शासन निर्णय क्र.अमृत-२०१६/प्र.क्र.१४५(१)/नवी-३३, दि.२३.६.२०१६ अन्वये रु.११४.३५ कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.
- या योजनेस मु.अ., मजीप्रा, अमरावती यांनी त्यांचे पत्र क्र. ५३१ दि.२९.३.२०१६ च्या पत्रान्वये तांत्रिक मंजूरी दिली आहे.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

- मंजूर वित्तीय आकृतीबंध :

| १. | **शासकिय अनुदान** | प्रकल्प किंमतीच्या | रूपये कोटीमध्ये |
|---|---|---|---|
| १. | केंद्र शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान | ५०% | रु.५७.१७५ |
| २. | राज्य शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान | २५% | रु.२८.५८ |
| ३. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा सहभाग (लोकवर्गणी) | २५% | रु.२८.५९ |
| | | | **एकुण रू.११४.३५ कोटी** |

- योजनेंतर्गत उपांगांचा तपशील :

| अ.क्र. | उपांगे | किंमत (लक्ष) |
|---|---|---|
| | **भाग अे-१** | |
| १ | सर्वेक्षणाची कामे | ३१.०० |
| | **यांत्रिकी आणि विदयुत कामे** | |
| २ | अशुध्द पाण्याचे ७५० एचपीचे - ६ व्हीटी पंप बदलविणे. | १९५.९३ |
| ३ | मुख्य जलकेंद्र सिंभोरा येथे ३३ के.व्हि. ए. विद्युत पुरवठा | ४१.१६ |
| ४ | शुध्द पाण्याचे पंप ५०एचपी ३८०२५०LPH २१m Head ४ Nos | ४४.१० |
| ५ | Flow Meter | ३३.६४ |
| ६ | Valve Actuator | १४४.८८ |
| ७ | Repairs to WTP ९५MLD | ६७.३२ |
| ८ | Refurbishment of WTP and Head Works | ९२.११ |
| | **स्थापत्य कामे** | |
| ९ | Repairs to Air Valve of Existing Rising Main and Gr.Main | ८९.५६ |
| | २००mm dia Air Valves ११२ Nos | |
| १० | WTP New ६१ MLD | १०९५.७९ |
| ११ | Transmission main D.I.K-७ २५० to ४००mm dia-१६.५०Km | ८०२.१८ |
| १२ | उंच व जमिनीवरील पाण्याची साठवण टाकी - २० लक्ष क्षमतेचे व २१ मिटर उंच - ६ टाक्या १५ लक्ष लिटर्स क्षमतेच्या व १८ मिटर उंच दोन टाक्या, १० लक्ष लि. क्षमतेच्या २० मिटर उंच १ टाकी, १० लक्ष लि. क्षमतेचे १ जमिनीवरील टाकी, ४० लक्ष क्षमतेची जमिनीवरील १ टाकी. | १६६०.४४ |
| १३ | वितरण व्यवस्था अस्तीत्वातील कालबाहय नलिका बदलविणे ११० ते २०० मिमि व्यासाच्या २६०.६१ कि.मि. व २५० ते ५०० मि.मि. डि. आय. के. ७ - २.८१ कि.मि. | ३०४३.७१ |
| १४ | नविन वाढीव वस्तीमध्ये वितरण नलिका टाकणे ११० ते १७९ मिमि व्यासाच्या २५१.५४ कि.मि. व २५० ते ५०० मि.मि. डि. आय. के. ७ -१९.११ कि.मि. | २९५९.६८ |
| १५ | सौरऊर्जा प्रकल्प | ११३३.०० |
| | **एकूण किंमत** | ११४३४.५० |
| | **म्हणजेच एकूण रु.११४.३५ कोटी** | |

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

भूसंपादनाचा तपशील :

योजनेंतर्गत ११ जलकुंभ बांधावयाचे प्रस्तावित असून, त्यासाठी लागणाऱ्या जागेसाठी भूसंपादनाची गरज नाही.

- योजनेची अंमलबजावणी यंत्रणा :

  अमरावती पाणी पुरवठा केंद्र हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीचे असून, या मंजूर योजनेची अंमलबजावणी ही मजीप्रामार्फत करण्यात येणार आहे.
- योजना पूर्ण करण्याचे नियोजन :

  योजनेंतर्गत कामे २ वर्षात पुर्ण करण्याचे नियोजित आहे.
- योजनेची सद्य:स्थिती :

  योजनेच्या निविदा प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

**ब) अमरावती पाणी पुरवठा केंद्राची माहिती :**

- अमरावती पाणी पुरवठा केंद्र हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीचे असून पाणी पुरवठा केंद्राची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती तसेच पाणीपट्टी वसुली म.जी.प्रा. मार्फत करण्यात येत आहे.
- पाणी पुरवठा केंद्राचे मागील १० वर्षातील देखभाल व दुरुस्ती खर्च, पाणीपट्टी वसुली, नफा इत्यादींचा तपशील :

| अ.क्र | वर्ष | नळ धारकांची संख्या | खर्च | वसुली | नफा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २००५-०६ | ५४४६५ | ९१७.२३ | १२३०.०६ | ३१२.८० |
| २ | २००६-०७ | ५७१०५ | १०७६.२९ | १११६.८९ | ४०.६० |
| ३ | २००७-०८ | ६२४०० | ११४०.२८ | १३९७.१४ | २५६.९० |
| ४ | २००८-०९ | ६३३२३ | ११४९.७६ | १५०३.५३ | ३५३.८० |
| ५ | २००९-१० | ६६०७० | १३०६.४६ | १५६२.५६ | २५६.१० |
| ६ | २०१०-११ | ६९३२९ | १५६९.९५ | १९२२.६४ | ३५२.७० |
| ७ | २०११-१२ | ७२१२३ | १८५३.७५ | २०५२.६५ | १९८.९० |
| ८ | २०१२-१३ | ७५३३९ | २००९.११ | २४४०.१० | ४३०.९९ |
| ९ | २०१३-१४ | ७८११५ | १९८१.७७ | २५६३.६६ | ५८१.८९ |
| १० | २०१४-१५ | ८१२६५ | २४१६.९६ | २९९०.६१ | ५७३.६५ |
| ११ | २०१५-१६ | ८५६३१ | २५९१.८४ | ३२१४.२८ | ६२२.४४ |

**क) २५% लोकवर्गणीचा हिस्सा मजीप्रामार्फत उभारण्याबाबतच्या प्रस्तावाचा तपशील:**

- सदर योजनेची २५% लोकवर्गणी अमरावती महानगरपालिकेने भरावयाची आहे. तथापी, सदर योजनेचे पाणी पुरवठा केंद्र मजीप्रा चालवित असल्याने, लोकवर्गणीची रक्कम मजीप्राने उभारणे अभिप्रेत आहे, असा ठराव क्र.४ दि.१९.१.२०१६ महानगरपालिकेने पारीत केलेला आहे. ठरावाची प्रत या सोबत संलग्न केली आहे.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

- मजीप्रामार्फत २५% लोकवर्गणीची रक्कम उभारण्याचे नियोजन :
  योजनेची मंजूर ढोबळ किंमत रु.११४.३५ कोटी इतकी असून, त्यानुसार २५% लोकवर्गणीची रक्कम रु. २८.५९ कोटी इतकी आहे. ही रक्कम मजीप्रा योजनेच्या सद्याच्या ८५,००० नळ जोडण्या वगळता येत्या ३ वर्षात होणाऱ्या वाढीव ३०,००० नळ जोडण्या व अस्तीत्वातील बिगर घरगुती व संस्था या प्रकारातील ग्राहकांकडुन लोकवर्गणी द्वारे रु. २८.५९ कोटी निधी प्राप्त करुन घेण्याचे नियोजित आहे.

नियोजनाचा सविस्तर तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशील | नळ ग्राहकांची संख्या | ग्राहक सहभाग प्रती ग्राहक | औविमम/ बेलोरा विमानतळ प्रा. (रु. लक्ष) | एकुण रककम (लक्ष) |
|---|---|---|---|---|---|
| १ | अस्तीत्वातील ७२१२३ नळ कनेक्शन धारकांना रु. १५०० प्रमाणे आकारणी करणे. | ७२१२३ नग | रु. १५००/- | | १०८१.८५ |
| २ | वाढीव नवीन घरगुती नळ कनेक्शन ३०,००० (२ वर्षात ९०% घरगुती ग्राहक) | २७००० नग | रु.२५००/- | | ६७५.०० |
| ३ | १० % गैरघरगुती ग्राहक | ३००० नग | रु.१५०००/- | | ४५०.०० |
| ४ | अस्तीत्वातील गैरघरगुती व मोठी ग्राहके | ९०० नग | रु.५०००/- | | ४५.०० |
| ५ | नवीन मागणी धारक म.औ. वि.म. १.५द.ल.ली. प्र.दि. त्यांचा ४८.५० कोटी पैकी वाटा १.५२ कोटी प्रती द.ल.ली. | ठोक ग्राहक | ० | २२८.०० | २२८.०० |
| ६ | बेलोरा विमानतळ पाणी पुरवठा ०.५ द.ल.ली. प्रती दिन त्यांचा वाटा ०.७६ कोटी | ठोक ग्राहक | ० | १०.०० | १०.०० |
| ७ | अमरावती गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ यांच्या मार्फत अकोली येथे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत अत्यंल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्या करीता बांधण्यात येणारी घरे व त्या भागात पाणी पुरवठा योजने करीता कॉस्ट शेअर रक्कम | | | ४८९.०६ | ४८९.०६ |
| | **एकुण रु.२९७९.०० लक्ष** | | | | |
| | **(२९.७९ कोटी)** | | | | |

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

मंजूर झालेल्या अमृत योजनेच्या अंमलबजावणीमुळे होणारे फायदे :

- ✓ सिंभोरा येथील अस्तित्वातील अशुध्द पाण्याची पंपीग मशिनरी कार्यक्षमता कमी झाल्याने पंप बदलल्यामुळे कार्यक्षमता वाढेल, तसेच तपोवन येथील शुध्द पाण्याचे पंप बदलल्यामुळे पंपाची कार्यक्षमता वाढुन एकंदरीत विज बिलात बचत होईल.
- ✓ तपोवन येथे २.० मॅगा वॅटचा सौर उर्जा प्रकल्प उभारणीमुळे विदयुत पुरवठयाअभावी होणा-या खर्चात बचत होईल.
- ✓ अस्तित्वातील जुन्या एसी/पीव्हीसी/जीआय पाईपव्दारे होणाऱ्या गळतीचे प्रमाण नविन पाईप टाकल्यामुळे कमी होऊन पाण्याची बचत होईल. अस्तित्वातील योजने अंतर्गत हिशोबबाहय पाण्याचे प्रमाण ४५% असुन प्रस्तावित कामे केल्यास सदर प्रमाण १०% ने कमी करणे शक्य होईल. पर्यायाने पाण्याची बचत व महसुलात वाढ होईल.
- ✓ विस्तारीत भागात पाईप लाईन टाकल्यामुळे ३०,००० नविन कनेक्शन वाढुन महसुलात वाढ होईल.

- अमृत योजने अंतर्गत मंजूर कामे केल्यास योजनेत अपेक्षित बचत तसेच वसुलीत होणारी वाढ :

| | **मुद्दा** | **बचत/उत्पन्न रुपये लक्ष प्रती वर्ष** |
|---|---|---|
| | नविन नळ जोडण्या वाढणे | रु. ३६०.०० |
| | सिंभोरा हेड वर्क येथील अशुध्द पाण्याचे लक्ष/वर्ष जुने व्हि.टी पंप बदलविल्यास विज बचतीमुळे. | रु. १०२.१२ |
| | एच. एस. आर. येथील शुध्द पाण्याचे जुने पंप बदलविल्यामुळे विज बचत. | रु. ४.५६ |
| | मालटेकडी अप्पर येथील पंपीग कमी केल्यामुळे | रु. ४.५६ |
| | एन.आर. डब्ल्यु. कमी झाल्याने | रु. १८२.०० |
| | म.औ.वि.म. यांचे कडुन मिळणारा महसुल (१५०० युनीट x २७.५० x ३६५) | रु. १५०.०० |
| | बेलोरा विमानतळ प्राधिकरणा कडुन मिळणारा महसुल (५०० युनीट x २७.५० x ३६५) | रु. ५०.०० |
| | **महसूलामध्ये एकुण अपेक्षित वाढ रु.८५३.२४ लक्ष/वर्ष** | |

- महाराष्ट्र सुजल निर्मल अभियाना अंतर्गत रु.८.७९ कोटी किंमतीची योजना शासन निर्णय क्र.सुनिअ/२००९/प्र.क्र.१३५/पापु-२२/मंत्रालय, मुंबई दि.७.५.२००९ अंतर्गत मंजुर झालेली होती. अमरावती पा.पु. केंद्र हे मजीप्राच्या मालकीची असल्याची बाब विचारात घेऊन या योजनेतील ३०% (२०% कर्ज व १०% लोकवर्गणी) ची रक्कम यापूर्वी मजीप्रा मार्फत भरण्यात आलेली आहे.

- महाराष्ट्र शासनाच्या विशेष अनुदान म्हणुन सुजल निर्मल अभियाना अंतर्गत शासन निर्णय क्र. सुनिअ/२०११ /प्र.क्र.४७८ /पापु-२२ दि.२१.१०.२०११ अन्वये मंजुर झालेल्या रु.१४.२९ कोटी किंमतीच्या योजनेच्या मंजूर आकृतीबंधानुसार १०% लोकवर्गणीची रक्कम रु.१.४२ कोटी आहे. दि.६.१०.२०१५ रोजी संपन्न झालेल्या मजीप्राच्या १३४ व्या संचालक मंडळाच्या बैठकीतीत सादर

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

करण्यात आलेल्या कार्यक्रमबाब क्र.३ नुसार पारीत केलेल्या ठरावा अंती १०% लोकवर्गणीची रक्कम रु.१.४२ कोटी मजीप्रा मार्फत भरण्यात आलेली आहे. या रक्कमेपैकी २ वर्षाच्या कालावधीत नवीन नळ धारक ग्राहकांकडुन रु.१०००/- प्रमाणे लोकवर्गणीची रक्कम वसुल करण्यात येत असुन आजपर्यंत रु.१.३६ कोटी इतकी रक्कम जमा झालेली आहे.

- अमरावती पाणी पुरवठा योजना सन १९८२ पासुन मनपा कडुन मजीप्राकडे हस्तांतरीत झालेली आहे. तेव्हापासुन कोणत्याही योजनेअंतर्गत महानगरपालिकेच्या हिस्याची रक्कम मजीप्रा मार्फतच भरण्यात आलेली आहे.

- याबाबत पूर्वआढावाअंती असे निदर्शनास आले की, कर्जाची रक्कम हुडको हया वित्तीय संस्थेकडून कर्ज उभारणीसाठी करावा लागणारी पूर्तता व त्यामध्ये येणा-या अडचणी व लागणारा दिर्घ कालावधी विचारात घेता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हिस्याची रक्कम अमरावती शहरातील ग्राहकांकडून वरील प्रमाणे प्रतिग्राहक वसूल करुन २५% लोकवर्गणी मजीप्रातर्फे उभारणेचे प्रस्तावित आहे.

- या योजनेबाबत मा.मंत्री पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे अध्यक्षतेखाली दि.२४.३.२०१५ रोजी मंत्रालय मुंबई येथे संपन्न झालेल्या आढावा बैठकीत सदर बैठकित केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानअंतर्गत अमरावती पाणी पुरवठा योजनेसाठीच्या लोकवर्गणीची रक्कम मजीप्रा मार्फत उभारण्याविषयी संचालक मंडळाच्या बैठकीत आवश्यक तो ठराव मान्यतेसाठी सादर करण्याबाबत ठरले आहे.

- वरील सर्व बाबींचा विचार करून मुख्य अभियंता, मजीप्रा,अमरावती यांनी केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत अमरावती पाणी पुरवठा योजनेसाठीच्या लोकवर्गणीची रक्कम मजीप्रामार्फत उभारण्याविषयीच्या कार्यक्रमबाबीचा प्रस्ताव मजीप्राच्या १३७व्या संचालक मंडळाच्या बैठकीतीत सादर करण्यास्तव मुख्य अभियंता यांनी त्यांचे पत्र क्र.लेखा-१२७० दि.६.८.२०१६ अन्वये सादर केलेला आहे.

- वरील सर्व बाबी विचारात घेता, अमृत अभियानांतर्गत अमरावती पाणी पुरवठा योजनेसाठीच्या लोकवर्गणीची रक्कम मजीप्रामार्फत उभारण्याविषयीच्या प्रस्तावास या कार्यालयाची शिफारस आहे.
तरी या प्रकरणी निर्णय घेण्याविषयी विनंती करण्यात येत आहे.

**ठराव :**

- केंद्र पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत अमरावती पाणी पुरवठा योजनेच्या मंजूर वित्तीय आकृतीबंधाप्रमाणे २५% हिस्सा रु.२८.५९ कोटी इतकी रक्कम मजीप्राने उभारणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

- या २५% हिश्श्याची रक्कम पाणी पुरवठा केंद्राच्या घरगुती व बिगर घरगुती ग्राहकांकडून अनुक्रमे रु.१५००/- व रु.५०००/- या दरानुसार एकरकमी अथवा रु.१२५/- व रु.४१६/- प्रती नळजोडणी याप्रमाणे पुढील २ वर्षात १२ समान हप्त्यात तसेच इतर MIDC, Airport इत्यादीच्या सहभागातून, अमरावती गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ यांचेद्वारे बांधण्यात येणारी घरे व त्या भागात पाणी पुरवठा योजनेकरिता अंशदान, कार्यक्रम बाबीमध्ये जोडलेल्या तक्त्यानुसार वसूल करुन खर्च भागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

- सदर रक्कम वसूल होईपर्यंत आवश्यक रक्कम मजीप्राच्या स्वनिधीतून खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
- अमरावती शहरासाठीच्या नगरोत्थान कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजनेसाठी गोळा केलेली लोकवर्गणीची रक्कम रु.२.२८ कोटी अमृत अभियानांतर्गत मंजूर योजनेच्या भांडवलीकरिता खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
- वरील प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यासाठी सदस्य सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.